७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

रविवार, दि. ३१ मे २०२६

www.dainikesandhya.com
www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १५५ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


## जरांगे यांचे उपोषण सुरू

मुंबई (दै. संध्या)



मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आजपासून अंतरवालीत आमरण उपोषण सुरु केलं आहे. उपोषण सुरु करण्याआधी मनोज जरांगे यांनी पहिल्यांदा माध्यमांशी संवाद साधला. यावेळी माझा संघर्ष प्रामाणिक आहे. सरकार येत राहिल, जात राहिल...मी उपोषणावर ठाम आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच ड्राफ्टपेक्षा 58 लाख नोंदी धारकांना कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, हा आदेश काढला पाहिजे, असं मनोज जरांगेंनी सांगितले.

मराठा समाज मोठा होऊ नये, असा विचार असणाऱ्यांची संख्या जास्त आहे. कितीही चांगला जीआर काढला तरी त्याला आव्हान दिलं जातं. सातारा संस्थानचा जीआर काढा. गॅझेटरनुसार अर्ज करणाऱ्याला प्रमाणपत्र द्या, व्हॅलिडीटी द्या नाही दिली तर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, असा आदेश काढावा, अशी मागणी मनोज जरांगेंनी केली. गुन्हे मागे घेण्यासाठी सरकारला अधिकार आहे, ते कलम कमी करू शकतात, बलिदान देणाऱ्या कुटुंबाचा निधी आणि नोकरीचा विषय आहे. मराठा आणि कुणबी मंत्रालय स्थापन करण्याचा एक विषय आहे, असंही मनोज जरांगे म्हणाले.

### मनोज जरांगे यांच्या १० मागण्या काय?

1) मराठवाड्यातील सर्व मराठ्यांना 29 मे च्या आता कुणबी प्रमाणपत्र द्या.
2) सातारा, कोल्हापूर, औंध आणि पुणे, मिरज संस्थांचा GR काढा. 1994 च्या धर्तीवरच GR काढा.
3) महाराष्ट्रातील सर्व सरसकट गुन्हे मागे घ्या.
4) आंदोलनात बलिदान देणाऱ्या कुटुंबीयांना महावितरण आणि MIDC मध्ये नोकरीचा GR काढा.
5) सारथीच्या सर्व योजना पुन्हा सुरू करा.
6) महामंडळाचे सर्व परतावे ताबडतोब वाटप केले पाहिजे.
7) कुणबी प्रमाणपत्र दिलेले त्याची व्हॅलिडिटी द्या.
8) मराठा उपसमिती काही कामाची नाही, अध्यक्षाला काम नाही. उपसमिती बरखास्त करा.
9) स्वतंत्र कुणबी आणि मराठा मंत्रालय स्थापन करा.
10) शिंदे समितीला मुदतवाढ देऊन रेकॉर्ड तपासायला लावा.

उपोषणाला बसलो तरी शिष्टमंडळ येणार आहे आणि नाही बसलो तरी शिष्टमंडळ येणारच आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्याय देण्याच्या भूमिकेत यावे. एकदा याच ठिकाणी आम्ही आमच्या आई-बहिणींना रक्ताच्या थारोळ्यात पाहिलं आहे. पुन्हा असा विचार करु नका. पोलीस लाठीचार्जच्या भानगडीत पडू नका. राज्यात तुम्हाला जड जाईल, असं मनोज जरांगेंनी सांगितले. आडवं बोलत नाही, सरकारला पट्ट्यावर घेत नाही आणि पुन्हा आंदोलन थांबणार नाही, असं इशारा मनोज जरांगेंनी दिला. संवाद करून गोडी गुलाबीने मार्ग काढा.

## सातारा सांगलीत भाजप - शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या लढतीची चर्चा

### शिवसेनेच्या तानाजीराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

सांगली (दै. संध्या)

विधानपरिषदेच्या सातारा सांगली मतदारसंघ महायुतीच्या जागा वाटपात भाजपकडे जाणार असल्याचं चित्र आहे. या मतदारसंघात नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे. सांगली जिल्ह्यातील शिवसेनेचे नेते तानाजीराव पाटील यांनी विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सातारा आणि सांगलीच्या जागेवर भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टी अशी निवडणूक होण्याची शक्यता असताना शिवसेनेच्या तानाजीराव पाटील यांच्याकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्यानं या मतदारसंघात रंगत निर्माण झाली आहे.

सांगली आणि सातारा विधानपरिषद मतदारसंघाच्या निवडणुकीच्या निमित्तानं



उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, असं तानाजीराव पाटील यांनी म्हटलं. माझे नेते स्वर्गीय अनिल बाबर यांच्यासोबत 30-32 वर्ष राजकारण आणि समाजकारणात काम करतोय. या 32 वर्षाच्या कालावधीत मित्रत्वाच्या नात्यानं सांगली आणि सातारा जिल्ह्यात मित्रांची संख्या आणि जीवाला जीव देणाऱ्यांची संख्या मिळवलीय ती मोठी आहे. सांगली आणि सातारा दोन जिल्ह्यातील सगळे कार्यकर्ते, नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांच्या मागणीमुळं पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज केला. सुहास बाबर, शंभूराज देसाई यांच्यासोबत जाऊन एकनाथ शिंदे यांच्याकडे उमेदवारी मागितलेली आहे.

## तीन पोलीस अधिकारी निलंबित

### पोलीस आयुक्तांचे आदेश



पुणे (दै. संध्या) : विषारी दारू प्रकरणात हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकासह तिघांना निलंबित करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी दिले. विषारी दारू प्रकरणात हडपसर परिसरातील चौघांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर समाज माध्यमात नागरिकांनी तीव्र प्रतिक्रिया नोंदविल्या, तसेच अवैध धंद्यांना पोलिसांनी पाठीशी घातले, असा आरोपही करण्यात आला. या घटनेची गंभीर दखल घेऊन पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी शुक्रवारी रात्री हडपसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, सहायक पोलीस निरीक्षक हसीना शिकलगार, तसेच उपनिरीक्षक हसन मुलाणी यांना निलंबित करण्याचे आदेश दिले.

## तुकाराम मुंढेंची मोठी कारवाई




मुंबई (दै. संध्या) : पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात विषारी गावठी दारूचे सेवन केल्यामुळे तब्बल 22 निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या भीषण 'मृत्यू तांडवा'नंतर संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली असतानाच, अन्न व औषध प्रशासनाने या प्रकरणाचे भिवंडी कनेक्शन शोधून काढत एक मोठी कारवाई केली. एफडीएचे धडाकेबाज आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या आदेशानंतर भिवंडीत मिथेनॉलचा मोठा साठा जप्त करण्यात आला आहे. पुण्यात झालेल्या मृत्यूस कारणीभूत ठरलेली विषारी दारू बनवण्यासाठी ज्या मुख्य केमिकलचा वापर करण्यात आला होता, त्याचा पुरवठा भिवंडीतून झाल्याचे तपासात निष्पन्न झालं. त्यानुसार, एफडीएच्या विशेष पथकानं भिवंडी परिसरातील 'मे. रेक्स इंटरनॅशनल' कंपनीच्या गोदामावर अचानक धडक छापा टाकला. या कारवाईत मानवी जिवासाठी अत्यंत घातक असलेल्या 'मिथेनॉल' या विषारी रसायनाचा सुमारे 5,929 किलोग्रॅमचा प्रचंड मोठा बेकायदेशीर साठा जप्त करण्यात आला आहे. पुण्यात विकल्या गेलेल्या दारूच्या भेसळीसाठी मुख्य रसायन याच कंपनीकडून पुरवण्यात आलं होतं. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, या अत्यंत विषारी आणि घातक द्रव्याची कोणतीही अधिकृत खरेदी-विक्रीची नोंद किंवा साठा कंपनीच्या नोंदवहीत उपलब्ध नव्हती.

## प्राजक्त तनपुरे यांचा भाजपत प्रवेश



अहिल्यानगर (दै. संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी आज अखेर भाजपमध्ये प्रवेश केला. गत अनेक दिवसांपासून प्राजक्त तनपुरे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा सुरू होती. त्यांनी वेळोवेळी आपल्या पक्षाविरोधातही भूमिका घेतली होती. अखेर त्यांनी आज भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपचे कमळ हाती घेतले. त्यांच्या भाजप प्रवेशामुळे शरद पवार गटाला जोरदार झटका बसला आहे. प्राजक्त तनपुरे हे शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे भाचे आहेत. त्यांनी 2019 च्या विधान सभा निवडणुकीत भाजपच्या शिवाजीराव कर्डिले यांना पराभूत करून विधानसभेत एन्ट्री केली होती. त्यानंतर महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये उच्च शिक्षण, ऊर्जा यासह एकूण 6 खात्यांचे राज्यमंत्रिपद मिळाले होते. पण त्यांच्या कुटुंबात आजोबा दोनदा आमदार होते, वडील एकदा खासदार व 5 वेळा आमदार राहिले, पण त्यानंतरही त्यांच्या कुटुंबांना मंत्रिपद मिळाले नव्हते. पण प्राजक्त तनपुरेंना पहिल्याच आमदारकीत राज्यमंत्रिपद मिळाले होते. त्यामुळे त्याची राज्यभर चर्चा झाली होती. पण गत काही महिन्यांपासून त्यांनी शरद पवार गटापासून अंतर राखले होते. हिंदुत्त्वावरील त्यांची भूमिका पाहता ते लवकरच भाजपमध्ये जातील अशी शक्यता व्यक्त केली जात होती. अखेर भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत त्यांनी आज भाजपमध्ये प्रवेश करून शरद पवार गटाला जोरदार धक्का दिला.

## संपादकीय

# कोळ्याचं जाळं नव्हे, हे झाडच.. निसर्गातून निराकाराकडे गेलेलं!

एक राखाडी, निष्पर्ण झाड. पार्श्वभूमीही राखाडी. झाडाच्या काळसर, मातकट रंगांतल्या फांद्या गुंतागुंतीच्या जाळ्यासारख्या पसरल्या आहेत, राखाडी रंगात बुडालेल्या. रंग जवळपास नाहीतच. झाडाची ओळख हळूहळू पुसट होत जाणारी. फक्त वर जाणाऱ्या आडव्या, वाकड्या रेषांची लय उरली आहे. बघताना आपण झाड विसरतो, फक्त रेषांचं संगीत ऐकू लागतो.पीट मॉन्ड्रिआन या डच चित्रकाराने १९११ साली रंगवलेलं हे सफरचंदाचं झाड. 'द ग्रे ट्री' हे मॉन्ड्रियनच्या संक्रमणकाळातील चित्र आहे. झाडाची प्रतिमा अजून ओळखता येते; पण ती भूमितीय रेषांमध्ये विखुरलेली आहे. निसर्गातून निराकारतेकडे झालेला प्रवास या चित्रातून आपण पाहू शकतो, झाडाची नैसर्गिक वक्रता हळूहळू सरळ रेषांमध्ये रूपांतरित होत आहे. रंग, आकार सगळं गाळून फक्त 'संतुलन' शिल्लक आहे. हे चित्र म्हणजे वास्तवाला निरोप देऊन अमूर्ततेच्या दारात ठेवलेलं पहिलं पाऊल. मॉन्ड्रिआन कला तत्त्वज्ञ आणि चिंतकही होता. चित्रकलेद्वारे निसर्गाच्या वैश्विक नियमांचा शोध घेता येऊ शकतो यावर त्याचा विश्वास होता. निसर्गाच्या वरवरच्या रूपापेक्षा त्यामागची शाश्वत रचना त्याला महत्त्वाची वाटत होती. मॉन्ड्रिआनला मूलभूत आकार आणि लयीचं सापडलेलं चित्रभान राखाडी झाडात नेमकं न्याहाळता येतं. निसर्गाच्या मूलभूत आकाराचा ताल शोधायचा इथे प्रयत्न आहे. फांद्यांच्या कमानीतून झिरपणारा प्रकाश न्याहाळताना रचनेतलं लोभस आंतरिक संतुलनही दिसायला लागतं. खरं तर हे झाड एकटं नाही, त्याच्या आधी आणि नंतरही एकेक झाड मॉन्ड्रिआनने रंगवलं. त्यातून केवळ



ऋतूंचं अवस्थांतर नाही, त्याच्या कलाशैलीतला बदलही स्पष्ट न्याहाळता येतो. पहिलं झाड लाल, जांभळी रंगीत शाल पांघरलेलं, पर्णहीन होण्याच्या अगोदरचं. त्यात झाडाची वास्तव आकृती स्पष्ट ओळखू येते. नंतर तो हळूहळू रंग आणि तपशील कमी करत गेला, तिसरं झाड संपूर्ण अमूर्ततेत समर्पित झालेलं आहे. त्याची पानं, खोड, फुलांचा बहर क्युबिस्ट रचनेत दर्शवला आहे. राखाडी झाडात या मूर्त ते अमूर्त प्रवासाच्या सर्व खुणा बरकरार आहेत. १९०८ पर्यंत मॉन्ड्रिआन डच परंपरेतील वास्तववादी निसर्गचित्र रंगवायचा. १९११ मध्ये पॅरिसला गेल्यावर त्याच्यावर क्यूबिझमचा प्रभाव पडला. राखाडी झाडात हा प्रभाव, त्याच्या वेगळेपणासकट स्पष्ट न्याहाळता येतो. इथे त्याने झाडाच्या वाढीचा उभा-आडवा ताण दाखवला आहे. झाडाच्या गाभ्यापर्यंत पोहोचण्याचा, त्याचा आत्मा शोधण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. यातूनच पुढे तो निओप्लास्टिसिझमपर्यंत पोहोचला. केवळ आडव्या-उभ्या रेषा आणि प्राथमिक रंग. आडवी रेषा म्हणजे पृथ्वी, स्त्रीत्व, स्थैर्य; उभी रेषा म्हणजे आकाश, पुरुषत्व, आध्यात्मिक वाढ. या दोन्हींच्या संतुलनातून परिपूर्ण सुसंवाद साधता येतो. या विचाराने विसाव्या शतकातली अमूर्त कला, डिझाइन, आर्किटेक्चर सगळं बदललं. मिनिमलिझम शैलीच्या उदयावर मॉन्ड्रिआनचा मोठा प्रभाव आहे. १९११ मध्ये जेव्हा हे चित्र पॅरिसमध्ये प्रदर्शित झालं, त्यावेळी 'हे झाड आहे की कोळ्याचं जाळं?' अशी टीका झाली. पण अवांत-गार्दे वर्तुळात त्याचं खूप कौतुक झालं. कलेच्या इतिहासात 'वास्तवातून अमूर्ततेकडे जाणारा पूल' म्हणून या चित्राची नोंद झाली आहे. हे राखाडी झाड एका चित्रकाराने स्वतःची भाषा शोधण्याचा, आणि कलेची व्याख्याच बदलण्याचा निर्णायक क्षण आहे.

## संस्कृत सुभाषित

एकत: क्रतव : सर्वे सहस्त्रवर दक्षिणा:! अन्यतो
रोगभीतानां प्राणिनां प्राण रक्षणम्।।

अर्थ – हजारो रुपयांची दक्षिणा देऊन केल्या जाणाऱ्या यज्ञापेक्षा रोगाने भयभीत झालेल्या प्राणीमात्रांना जीवदान देणारे औषधोपचार श्रेष्ठ आहेत.

## गुरु वचन

### इतरांचेही दु:ख पहा

एकदा एका झाडाखाली सशांनी आपली एक तातडीची सभा बोलावली. सर्वच ससे दु:खी आणि घाबरलेले होते. एक ससा उभा राहून म्हणाला, ''मित्रहो, आपलं जीवन फारच दु:खी आहे आणि या दु:खातून आपली सुटका होणे कधीही शक्य नाही. आपल्याला मनुष्य, कुत्रा, गरूड आणि इतरही अनेक लहान मोठ्या प्राण्यांपासून धोका आहे. तेव्हा आपण सर्वचजण एखाद्या तलावात जाऊन जीवन देऊया.

जिवंतपणी या अनंत यातना भोगण्यापेक्षा मरण परवडले. शिवाय आपण एकत्र मरू. म्हणजे दुसऱ्याच्या मरणाचे दु:खही करायला नको.'' त्या सशाचे बोलणे सर्व सशांना पटले. त्या सर्वांनी एकाच वेळी प्राणत्याग करण्याचे ठरवले. प्राणत्याग करण्याचा दिवसही ठरविला गेला.

ठरलेल्या दिवशी सर्व ससे आपल्या कुटंबातील लहानथोरांसह एकत्र जमले. थोड्याच वेळात सशांचा एक मोठा समूह तळ्याकाठी आला. त्या तळ्याकाठच्या चिखलात बरेच लहानमोठे बेडूक खेळत होते. सशांना पाहून ते घाबरले आणि त्यांनी भराभर तळ्यात उड्या टाकल्या. ते पाहून एक हुशार ससा म्हणाला,

''मित्रांनो, थांबा. घाई करू नका. आता तुम्ही पाहिलंत ना. आपल्याला घाबरणारे प्राणीही या जगात आहेत. त्यांचं दु:ख आपल्यापेक्षाही मोठं आहे. तरीही ते हिंमत बाळगून जगताहेत ना मग आपण कशाला दु:खी आणि निराश व्हायचं! या प्राण्यांपेक्षा आपण सुखी आहोत.

तेव्हा आपल्यापेक्षा सुखी प्राण्यांकडे न पहाता दु:खी प्राण्यांकडे पाहून आपण जगायला हवे. म्हणजे आपले दु:ख आपल्याला जाणवणार नाही. तेव्हा चला आता आपआपल्या घरी आणि आनंदाने जगा.'' त्या सशाचे बोलणे सर्वांनाच पटले. आनंदाने उड्या मारीत ते आपापल्या घरी परतले.

## सुविचार

मी – एक तत्त्ववेत्ता – या हाडामांसाच्या पिंज्र्यात राहतो.

– केदार जोशी

## उपदेशकथा

समुद्रकाठी एक टुमदार शहर होते. तेथे पौर्णिमेचा चंद्र उदयास आला. त्याचे सौंदर्य काय वर्णन करावे ! पण त्याच्याकडे पाहून त्या शहरातील कुत्र्यांना काही चैन पडेना. सारे कुत्रे चंद्राकडे पाहून मोठमोठ्याने भुंकायला लागले. अर्थात त्यामुळे शहरातील शांतता भंग पावली. कुत्र्यांमध्ये एक शहाणा कुत्रा होता. तो आतापर्यंत गप्प होता. इतर कुत्रे जेव्हा भुंकणे थांबवितात तेव्हा तो त्यांना म्हणाला, "अरे, तुमचे भुंकणे काही चंद्रापर्यंत पोचणार नाही आणि उगीच पृथ्वीवरील शांतता मात्र भंगणार. म्हणून गप्प बसा ना.'' सर्व कुत्रे भुंकण्याचे थांबले पण भुंकू नका असा उपदेश करणारा कुत्रा मात्र शांततेसाठी रात्रभर भुंकत होता.

कथा उपदेश : स्वत:ला शहाणे समजून लोक असाच उपदेश करीत असतात.

## पंचांग

पंचांग
३१ मे २०२६
रविवार
विक्रम संवत्– २०८२
अधिक ज्येष्ठ शके
संवत्– १९४८
संवत्सर – पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– अधिक ज्येष्ठ
ऋतु– सौर ग्रीष्म
शुक्ल पक्ष
तिथि:पूर्णिमा १४:१४:५७
नक्षत्र:अनुराधा
१६:११:३६

योग:सिद्ध (अहोरात्र)
करण:बव १४:१४:५७
करण:बालव
२७:२५:४३+
सूर्य:वृषभ
चन्द्र:वृश्चिक
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – जिल्हेज
तारीख – १४
विशेष
अहिल्याबाई होळकर
जयंती (तारेखप्रमाणे)
पौर्निमा समाप्ती
दुपारी २.१४

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | | | | | | 3 | | |
| | | | 9 | 3 | 7 | 5 | 2 | 6 |
| | | 2 | | | 1 | | | |
| 2 | 8 | | 7 | | | | | |
| 6 | 4 | 1 | | | | 8 | 7 | 2 |
| | | | | | 8 | | 5 | 1 |
| | | | 8 | | | 2 | | |
| 8 | 2 | 6 | 3 | 4 | 5 | | | |
| | | 3 | | | | | | 4 |

### : सूडोकु :

**खेळाचे नियम :** प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९६४ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2 | 1 | 9 | 3 | 7 | 8 | 4 | 6 | 5 |
| 7 | 6 | 8 | 5 | 2 | 4 | 1 | 3 | 9 |
| 4 | 3 | 5 | 1 | 9 | 6 | 8 | 7 | 2 |
| 1 | 2 | 6 | 4 | 3 | 5 | 9 | 8 | 7 |
| 9 | 5 | 4 | 6 | 8 | 7 | 3 | 2 | 1 |
| 3 | 8 | 7 | 2 | 1 | 9 | 5 | 4 | 6 |
| 6 | 4 | 2 | 8 | 5 | 1 | 7 | 9 | 3 |
| 8 | 7 | 1 | 9 | 6 | 3 | 2 | 5 | 4 |
| 5 | 9 | 3 | 7 | 4 | 2 | 6 | 1 | 8 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १२२३ – कालका नदीची लढाई – चंगीझ खान व पूर्व स्लाव्हिक सैन्यांमध्ये चकमक. मोंगोल सैन्याचा विजय.
- १७५९ – अमेरिकेच्या पेनसिल्व्हेनिया प्रांतात नाटकांवर बंदी.
- १७९० – अमेरिकेत १७९०चा कॉपीराईट कायदा लागू.
- १८६२ – अमेरिकन गृहयुद्ध – सेव्हेन पाईन्सची लढाई.
- १८६४ – अमेरिकन गृहयुद्ध – कोल्ड हार्बरची लढाई.
- १८८४ – जॉन हार्वे केलॉगने कॉर्न फ्लेक्सचा पेटंट मिळवला.

### राष्ट्रीय

- २००६ – भारताने पोखरणच्या वाळवंटात जमीनीवरून जमीनीवर मारा करणाऱ्या ब्रह्मास्त्र क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली.

### जन्म

- १०४८ – उमर खय्याम, पर्शियन कवी, तत्त्वज्ञानीचा जन्म.
- १४६९ – मनुएल पहिला, पोर्तुगालचा राजाचा जन्म.
- १५५७ – फियोदोर पहिला, रशियाचा झारचा जन्म.
- १६४० – मिकाल विस्नियोवीकी, पोलंडचा राजाचा जन्म.
- १८५२ – फ्रान्सिस्को मोरेनो, आर्जेन्टिनाचा शोधकचा जन्म.
- १८५७ – पोप पायस अकरावा याचा जन्म.
- १८८३ – लॉरी क्रिस्चियन रिलॅन्डर, फिनलंडचा राष्ट्राध्यक्षाचा जन्म.

### निधन

- १४०८ – अशिकागा योशिमित्सु, जपानी शोगनचे निधन.
- १४१० – मार्टिन पहिला, अरागॉनचा राजाचे निधन.
- १७४० – फ्रीडरीक पहिला, प्रशियाचा राजाचे निधन.
- १७९९ – पियरे लेमॉनिये, फ्रेंच अंतराळतज्ञाचे निधन.

## : SMS :

When I Go
Wrong I Need
Ur Hand 2 Correct
When Emotionz Burst I
Need Ur Hand 2 Catch
When I Win I need Ur
Hands 2 Clap
In Short
Ye Haath Mujhy De De
Thakur ...

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.२ | २५.४ |
| अहमदनगर | ३९.७ | २४.३ |
| अकोला | ४१.८ | ३०.७ |
| अमरावती | ४४.४ | २९.६ |
| बीड | ४६.५ | ३३.५ |
| भंडारा | ४५.८ | ३३.३ |
| बुलढाणा | ३९.६ | २५ |
| चंद्रपूर | ४६.५ | ३३.३ |
| चेन्नई | ४७.८ | ३४.४ |
| नवी दिल्ली | ४०.७ | २६.२ |
| धुळे | ४२ | २७.९ |
| गोंदिया | ४४.९ | ३१.६ |
| जळगाव | ४३ | २९.२ |
| कोल्हापूर | ३८.८ | २५.३ |
| लातूर | ३८.८ | २६.४ |
| मुंबई | ४१.२ | ३६.६ |
| नागपूर | ४५.६ | ३२.९ |
| नांदेड | ४२.६ | ३१.९ |
| नंदूरबार | ३९.५ | २६.२ |
| नाशिक | ३८.३ | २५.२ |
| पुणे | ३६.४ | २४.२ |
| पंढरपूर | ४३.२ | २६.८ |
| सातारा | ३९.९ | २४.६ |
| सांगली | ४१ | २५.६ |
| सोलापूर | ४२.२ | २८.९ |
| वर्धा | ४५.५ | ३१.६ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** आरोग्याच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करु नका. प्रवासात खिसा पाकीट व मौल्यवान वस्तू सांभाळा.

**तुळ :** आपली सामाजिक प्रतिमा उजळणार आहे. कौटुंबिक शुभ–समारंभाचे आयोजन केले जाईल.

**वृषभ :** जिभेवर साखर पेरणी करुन आपले ध्येय साध्य करता येईल. राजकीयक्षेत्रात नवनवीन उपक्रम राबविले जातील.

**वृश्चिक :** जमाखर्चाचा मेळ बसविणे कठीण होईल. कर्ज काढताना सावधानता बाळगावी. मनोरंजनाकडे कल राहील.

**मिथुन :** कामाचा व्याप वाढल्यामुळे जवळच्या नातलगाला आपल्या व्यवसायात सहभागी करुन घ्याल. मित्र परिवारा बरोबर सुग्रास भोजनाचे बेत आखाल.

**धनु :** जोडीदाराशी सुसंवाद साधावा लागेल. विश्रांतीसाठी जरा बदल करण्याची आवश्यकता वाटेल. विरोधकांवर विजय मिळवाल.

**कर्क :** आपल्या वाक्यचातुर्याच्या जोरावर मोठी मजल माराल. उष्णतेचे विकार, संसर्गजन्य विकार यांपासून त्रास होण्याची शक्यता राहाते.

**मकर :** नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी लागेल. मातुल घराण्याकडून सहकार्य लाभेल. विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षांतून चांगला फायदा होईल.


**सिंह :** विरोधकांचा त्रास जाणवेल. कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नका. व्यवसायात जम बसविता येईल. परंतू अतिशय मेहनत घेण्याची आवश्यकता आहे.

**कुंभ :** नोकरीत पदोन्नती होईल. व्यवसाय–उद्योगात नवीन कार्यारंभ कराल. जबाबदारीची कामे स्वीकाराल. बेकारांना सुवर्णसंधी चालून येतील.

**कन्या :** ललित कला, वैशिष्ट्यपूर्ण लिखाण, खेळ, यातून प्रतिष्ठा उंचावेल. धार्मिक स्थळांना सहलीस जाण्याचे बेत आखाले जातील.

**मीन :** आपल्या कामाच्या पूर्ततेसाठी दुसऱ्यांवर अवलंबून राहू नका. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आपल्याला व्यावसायिक उत्कर्ष साधणे सोपे जाईल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९६५



**आडवे शब्द**

१. मराठीत जोकर
३. वार्ताहर
७. वस्तू मिळाल्याची पोहोच
९. नकाराचा शब्द
१०. कंटाळा आल्याचे दाखवणारी (अ.व.)
११. गतिमान
१३. आबालवृद्धांसाठी उपयोगी कल्प– त्यातील वनस्पती
१६. मुलींचे हे नाव बेळगावी मिठाईवरून ठेवतात की नाजुकशा फ ुलावरून?
१७. गडीमाणसे
२१. पद्धत
२३. कंटाळवणे, रसहीन
२५. 'च'च्या भाषते फुकट
२७. राष्ट्राची सीमा
२९अ. संधी, मोका
३१. विश्वासघातकी
३२. खेळातून बाद, हद्दपार
३३. पदर
३४. दबा धरणे
३६. किरकोळ
३९. नऊ दिवसच टिकणारे अप्रूप!
४२. लबाडीचा हेतू
४२अ. कच्चे लिखाण (इंग्रजी)
४४. कणखर, रांगडा
४५अ. सोंगट्या मांडण्याचे वस्त्र
४६. एकाग्र नजर
४८. सजीव– निर्जीव सर्व
५०. रागाचा उद्रेक
५२. एक जंगली फूल
५३. चित्रविचित्र रंगाचा, ठिपक्या ठिपक्यांचा
५४. एक प्रकारे जीवनदान!
५६अ. मन आकर्षून घेणारे
५७अ. कूळकायद्याचे मूळ तत्त्व
६१. तात्काळ, वेगात
६४. सारखा
६६. किटाळ, आळ
६८. पावलोपावली
६९. संत एकनाथांचे गुरु
७१. 'बटण स्टार्ट'मुळे आता ही कालबाह्य! (इंग्रजी)
७२. पावसाची झड
७३. नवरत्नांपैकी प्राणिज रत्न
७४. कारस्थानी
७५. पाताळ, विनाशाची गर्ता
७६. अभिप्राय

**उभे शब्द**

१. सर्वनाश घडवून आणणारे
२. कन्या (संस्कृत)
३. बोरींच्या गावचे काटेरी झाड
४. काव्यात त्याला
५. वैरी, खटला गुदरणारा
६. अंगातील मस्ती, जोम
७. जन्मदाता
८. अशुभ घटनेचा संशय दर्शवणारा वाकप्रचार
१२. 'बोलीची काढी– बोलाचाच भात' रांधणारा!
१४. उपवासाचे तांदूळ
१५. साग्रसंगीत
१८. मांडणी
१९. मिसळीतील तर्री
२२. ईर्ष्या, ठाम निश्चय
२४. टाळाटाळ, चुकवाचुकव
२६. वार
२८. तडीपार
२९. मिठाची चव
२९अ. अमावस्या
३०. वारा (संस्कृत)
३१. होमातील आहुती
३२अ. चकवून जाण्याचा मार्ग
३५. सैन्याची तुकडी
३७. घाबरणे, धास्ती घेणे
३८. तफावत, अंतर
३८अ. कणखर (इंग्रजी)
४०. जंगलातील प्राणी
४१. मुलींचे एक नाव
४२. कंप पावणारा
४३. केर
४५. शेवटचे वस्त्र!
४६. पहिला अंक
४७. शेंगेवरील आवरण
४९. संघर्षात रक्त सांडणे
५१. घटस्फोट
५३. दगडाचा पातळ पापुद्रा
५५. गव्हाचे शिजवलेले सत्त्व
५६. खळबळजनक
५८. सेनानायक
५९. राजीनामा
६०. हिंदीतील मूळ, मराठीत वजनदार
६१अ. धान्य साठवणीचे पात्र
६२. डागाळलेला
६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ
६५. मनगटात जोर असलेला
६७. आपला देश
६९. सततचे नामस्मरण
७०. पुरुष
७२. समान, तुल्यबळ

### जम्बो शब्दकोडे क्र. ९६४ चे उत्तर

आडवे उत्तर १.कुख्यात ३.अमृत ६.कारवाई १०.मत ११.ताजा १२.जय जवान १३.भय १४.कनात १६.गमन १७.मळमळ १९.कनक २२.शिष्य २४.मर २५.कमला २६.नकलाकार २८.मावळण ३०.कानवला ३२.धार ३३.लाचार ३५.टचटचीत ३९.नवनीत ४१.करा ४३.मानव ४४.रचनाकार ४६.नमन ४८.टपाल ५१.जगन्नाथ ५२.वीर ५३.कृपा ५४.सातत्य ५६.जीवन ५८.रात ५९.तपास ६०.धाम ६१.निवारक ६२.हस्त ६४.रसना ६६.जलाशय ६८.हस्तपत्रक ७१.मठ ७३.अनल ७४.गर्व ७५.वाट ७६.सवंगडी ७८.कोय ७९.मालक ८०.परत ८१.नशा ८२.कारा ८३.छाया ८४.नमक

उभे उत्तर : १.कुमक २.ख्यातनाम ३.अजागळ ४.तपन ५.यजमान ६.काजळ ७.रवा ८.वानवा ९.पाय १३.भविष्यकाळ १५.तळमळ १८.मरणयातना १९.कलाकार २०.कडवट २१.धन २२.शिला २३.समाधान २५.कमलाकार २७.कपची २९.वरवर ३१.लाच ३४.चारा ३६.टवटवीत ३७.तमाल ३८.जवळपास ४०.नीच कृत्य ४२.तमन्ना ४५.काळजीवाहू ४६.नग ४७.नथ ४९.पार ५०.असाधारण ५१.जनकजननी ५३.कृपापात्र ५५.तमस ५७.वर ५८.रास्त ६२.हयगय ६३.मस्तवाल ६५.नामवंत ६७.लाल ६९.पटकन ७०.कथानक ७२.ठग ७६.सर ७७.डीन ७८.कोरा ७९.माया

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### विषारी दारु प्रकरणी बिटिया फौंडेशन आणि गुलाबो गँगचा हल्लाबोल

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहरात विषारी दारूमुळे निष्पाप नागरिकांचे मृत्यू झाल्याच्या घटनेविरोधात आज Bitiya Foundation आणि गुलाबो गँगच्या वतीने हल्लाबोल करण्यात आला. शहरातील बेकायदेशीर दारू विक्री करणाऱ्या एका गुत्त्यावर जाऊन निषेध आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधण्यात आले. "दारू माफियांवर तात्काळ कारवाई करा", "निष्पाप नागरिकांच्या मृत्यूला जबाबदार कोण?" जबाबदार विषारी दारूच्या ठेकेदारांवर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल केला पाहिजे आणि ही दारू पिऊन जे मृत्युमुखी पडले त्यांच्या कुटुंबांना आर्थिक मदत सरकारने केली पाहिजे अशा घोषणा देत संताप व्यक्त करण्यात आला. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या बेकायदेशीर दारू व्यवसायावर कठोर कारवाई करून दोषींना तात्काळ अटक करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली. तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पुणे पोलिस प्रशासन आणि राज्य शासनाने विशेष मोहीम राबवावी, अशीही मागणी बिटिया फौंडेशन आणि गुलाबो गँगच्या च्या वतीने करण्यात आली श्रीमती संगिता तिवारी यांच्या नेतृत्वाखालीआणि महिला षहकारी शोभा पणिकर सोनिया ओव्हाळ, भारती लोंढे, निकिता भालेराव, माया वाघमारे, सिंधू धोत्रे, सुनिता भालेराव, स्वाती शिंदे, अंजना नागटिळक, सखुबाई कांबळे आंदोलनकर्त्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला.

### पुण्यात जनगणना करणाऱ्या महिलेला मारहाण, आयुक्तांचे पोलिसांना पत्र

पुणे (दैनिक संध्या) : देशभरात जनगणनेचे काम जोरदार सुरू आहे. राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षकांबरोबरच सरकारी कार्यालयात अनेक कर्मचाऱ्यांना हे जनगणनेचे काम देण्यात आले आहे. त्यानुसार जनगणना करण्यासाठी प्रगणक म्हणून नियुक्ती केलेले कर्मचारी घरोघरी जाऊन काम करत आहेत. जनगणनेसाठी येणारे कर्मचारी नक्की कशासाठी हे काम करत आहेत. याची माहिती नसल्याने नागरिकांकडून त्यांना विरोध केला जात आहे. तर काही भागात किरकोळ वादाचे प्रकार देखील घडत आहेत. मात्र दोन दिवसांपूर्वी जनगणनेसाठी आलेल्या कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आल्याचा प्रकार घडला. पालिकेच्या महिला कर्मचाऱ्याला मारहाण करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांच्यावर कारवाई करावी. झोपडपट्टी आणि संवेदनशील भागात जनगणना करण्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सुरक्षिततेसाठी पोलीस कर्मचारी देण्याची व्यवस्था करावी,' असे पत्र महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांना दिले. पुणे महापालिकेच्या बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालयांतर्गत जनगणनेचे काम करणारी महिला कर्मचारी आणि तिच्या मुलावर या भागातील १० ते १२ जणांनी हल्ला करून त्यांना मारहाण केली. या महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. जनगणना करणे हे राष्ट्रीय कर्तव्य असल्याने हे काम करण्यासाठी महापालिकेने नियुक्त केलेल्या महिला प्रगणक बिबवेवाडी भागातील एका वसाहतीमध्ये गेल्या होत्या. त्या वेळी त्यांच्यावर हल्ला झाला.



### हमीपत्राच्या आधारे अकरावीचा प्रवेश शक्य; मंडळाकडून गुणपत्रक डिजिलॉकरवर उपलब्ध

पुणे (दैनिक संध्या) : राज्य मंडळाने दहावीचा निकाल जाहीर केल्यानंतर अद्याप विद्यार्थ्यांना गुणपत्रकांचे वाटप केलेले नाही. मात्र, अकरावीच्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना दहावीचे गुणपत्रक आणि शाळा सोडल्याच्या दाखल्याची सक्ती न करता हमीपत्राच्या आधारे प्रवेश देण्याच्या सूचना माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने स्पष्ट केले आहे. माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे विभागीय शिक्षण उपसंचालकांना दिल्या आहेत. सन २०२६-२७ मधील इयत्ता अकरावी प्रवेशाची प्रक्रिया सुरु आहे. २१ मे पासून प्रवेश प्रकियेतील पहिल्या नियमित फेरीला सुरुवात करण्यात आली आहे. या फेरीमध्ये दिनांक २९ मे रोजी प्रवेशासाठीची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे.

### विधान परिषदेसाठी महाविकास आघाडीकडून श्रीकांत पाटील यांना उमेदवारी

पुणे (दैनिक संध्या) : पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषदेच्या जागेसाठी महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष, माजी नगरसेवक श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे आता महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचा उमेदवार कोण असणार आणि भाजप उमेदवार उभा करणार का, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे. या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि भाजप या महायुतीतील मित्रपक्षांकडून दावा करण्यात येत असताना महाविकास आघाडीने श्रीकांत पाटील यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यामुळे महायुतीचा उमेदवार कोण असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. श्रीकांत पाटील हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे शहराध्यक्ष आहेत. त्यांनी बोपोडी भागातून नगरसेवक म्हणून काम केले आहे. त्यांचे वडील वि. भा. पाटील हे १९६९ मध्ये पुण्याचे महापौर होते. तसेच १९७७ मध्ये ते पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले होते. आता श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. या मतदार संघात ८६७ मते आहेत. त्यामध्ये पुणे महापालिकेतील १६५ नगरसेवक आणि १० स्वीकृत नगरसेवक, जिल्हा परिषदेत निवडून आलेले ७३ सदस्य आणि १३ नियुक्त केलेले सदस्य आहेत. नगर परिषद आणि नगरपंचायतींमध्ये सर्वाधिक ४३२ निवडून आलेले सदस्य आणि ४३ नियुक्त केलेले सदस्य आहेत. पुणे, देहूरोड आणि खडकी कॅन्टान्मेंट बोर्डात प्रत्येकी एक नियुक्त सदस्य आहे. त्यांपैकी 'राष्ट्रवादी'ने त्यांच्याकडे ३७० मते असल्याचा, तर भाजपने ३३३ मते खात्रीची असल्याचा दावा केला आहे. 'या मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे श्रीकांत पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

# 'दगडूशेठ' गणपती ट्रस्टच्या 'श्रीमंत' कॉफी टेबल बुकचे प्रकाशन

**ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांची उपस्थिती ; सामाजिक, धार्मिक, आरोग्य क्षेत्रातील कार्याचा विस्तृत आढावा**

पुणे (दै. संध्या)

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या 'श्रीमंत' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन नुकतेच मंदिरात झाले. ट्रस्टच्या सामाजिक, धार्मिक, आरोग्य क्षेत्रातील कार्याचा विस्तृत आढावा यामध्ये घेण्यात आला असून ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी यांच्या हस्ते हा प्रकाशन सोहळा पार पडला.

या ग्रंथपुष्पाचे प्रायोजकत्व वामन हरी पेठे ज्वेलर्स यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

यावेळी वामन हरी पेठे ज्वेलर्सचे भागीदार आशिष पेठे, गौरी पेठे, आदिवेद ॲडव्हर्टायजिंग सर्जनशील संचालक व लेखक मिलिंद घैसास, कला संचालक



स्वाती घैसास, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, उपाध्यक्ष डॉ.रामचंद्र उर्फ बाळासाहेब परांजपे, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे सौरभ रायकर, यतिश रासने, मंगेश सूर्यवंशी, प्रतीक घोडके यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. आदिवेद ॲडव्हर्टायजिंग ने देखील या कार्यात विशेष सहभाग घेतला.

मोहन जोशी म्हणाले, आजचा दिवस हा माझ्या आयुष्यातील कायम लक्षात राहणारा दिवस असेल. मंदिरात आल्यानंतर खूप प्रसन्न वाटले. श्रीमंती ही क्षणिक नसून ती शाश्वत आहे. सेवा, साधना आणि सदभावनेतून ती साकारलेली आहे. ट्रस्टचे सुरु असलेले सर्वच क्षेत्रातील कार्य कौतुकास्पद असून त्यासाठी माझ्या शुभेच्छा.

ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने म्हणाले, आजपर्यंतची मंदिराची वाटचाल आणि ट्रस्टच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक असे जे जे कार्य घडले, ते या कॉफी टेबल बुकमध्ये आहे. मंदिराचा जो प्रवास आहे, तो एक गणपती मंडळ ते तीर्थक्षेत्र असा प्रवास यातून उलगडून दाखविण्यात आला आहे. ट्रस्टने पारदर्शकतेच्या आधारे समाजाच्या तळागाळातील प्रत्येक घटकाचा विश्वास संपादन केला असून त्याच विश्वासाच्या भक्कम पायावर ही समाजकार्याची श्रीमंती उभी असल्याचे त्यांनी सांगितले.

## तरुणीची छेड काढण्याचा प्रयत्न, संशयित तरुणाला स्थानिकांकडून मारहाण

पुणे (दै. संध्या)

बिबवेवाडी परिसरातील ओठा भागात एका तरुणीचा विनयभंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयित तरुणाला स्थानिक नागरिकांनी पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. गुरुवारी(दि.२९) रात्री साडेनऊ ते दहा वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली. या घटनेनंतर रात्री अकरा वाजेपर्यंत परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिकांची गर्दी झाली होती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, पीडित तरुणी रिक्षातून उतरून तिच्या घराच्या दिशेने जात होती. दरम्यान, बिबवेवाडी गावठाण परिसराच्या कमानीपासून एका तरुणाने तिचा पाठलाग सुरू केला. साधारण अर्धा किलोमीटर मागे धावत येत, त्याने तरुणीच्या अंगावर स्वतःचे जॅकेट टाकून तिच्याशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला. पीडित तरुणी आणि संशयित आरोपी यांची एकमेकांशी कोणतीही पूर्वओळख नव्हती, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली आहे.

तरुणीने प्रतिकार केल्यानंतर स्थानिक नागरिक तातडीने तिच्या मदतीला धावून आले. नागरिकांनी पळून जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या संशयिताला घटनास्थळीच पकडले आणि त्याची चौकशी करत पोलिसांना पाचारण केले. हा तरुण याच परिसरातील रहिवासी असल्याचे समजते.

घटनेची माहिती मिळताच बिबवेवाडी पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संशयित तरुणाला ताब्यात घेतले असून, त्याला पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. पीडित तरुणीच्या जबाबानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. सद्यस्थितीला परिसरातील शांतता पूर्ववत झाली आहे.

# डॉक्टरच्या हलगर्जीपणाने घेतला आईसह बाळाचा जीव, सिटी केअर हॉस्पिटलमधील घटना

पुणे (दै. संध्या)

वडगाव शेरी येथील सिटी केअर हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे प्रसूतीनंतर महिलेचा आणि नवजात बाळाचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. प्रसूतीनंतर अतिरक्तस्त्रावामुळे मुमतरीन मणियार (वय ३७) या महिलेचा बुधवारी (दि. २७) मृत्यू झाला, तर दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी (दि. २८) उपचारादरम्यान नवजात बाळाचाही मृत्यू झाला.

सिटी केअर हॉस्पिटलमध्ये प्रसूतीच्या वेळी मुख्य डॉक्टर डॉ. वैभव दुंघाव हजर नसून केवळ सहाय्यक डॉक्टरच उपलब्ध होते. त्यांनी मुमतरीनला वेळेत सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलवले नाही. यामुळे तिचा मृत्यू झाला. शिवाय, प्रसूतीदरम्यान चुकीच्या पद्धतीने व्हॅक्यूम पंपाच्या साहाय्याने बाळाला बाहेर काढलश्याने बाळाला गंभीर दुखापत झाली, असाही दावा कुटुंबाने केला आहे.

या संपूर्ण प्रवासात वेळेवर कार्डियाक रुग्णवाहिका न मिळाल्याचा आणि रुग्णालयांनी कागदपत्रांची फेरफार केल्याचाही आरोप नातेवाईकांनी केला आहे. केईएम रुग्णालयाने आधी मृत्यू दाखला दिला, पण जेव्हा कुटुंबाने पोलिसात तक्रार केल्याचे आणि शवविच्छेदनाची मागणी केल्याचे सांगितले, तेव्हा कागदपत्रे गहाळ झाल्याचे सांगत मृतदेह ससून रुग्णालयात पाठवण्यात आला, असा आरोप नातेवाईकांनी केला. यामुळे सदर प्रकरणातील गांभीर्य वाढले आहे.

वडगावशेरी येथील मणियार कुटुंबासाठी बकरी ईदचा सण काळा दिवस ठरला आहे. एका खाजगी रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झालेल्या मुमतरीन मणियार (वय ३७) या महिलेचा प्रसूतीनंतर अतिरक्तस्त्रावामुळे मृत्यू झाला, तर दुसऱ्याच दिवशी तिच्या नवजात बालकानेही जगाचा निरोप घेतला.

मुमतरीन यांना वडगावशेरी येथील 'सिटी केअर हॉस्पिटल'मध्ये दाखल करण्यात आले होते. प्रसूतीदरम्यान मोठ्या प्रमाणावर रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांना येरवड्यातील नगर रस्त्यावरील 'सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये हलवण्यात आले, जिथे उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा झटका आला. तिच्या अवघ्या एक दिवसाच्या बाळाचे हृदयाचे ठोके व्यवस्थित सुरू असताना, त्याला आधी खराडी येथील 'रायझिंग मेडिकेअर हॉस्पिटल अँड आयव्हीएफ केअर सेंटर'मध्ये हलवण्यात आले. त्यानंतर तिथून त्याला 'केईएम हॉस्पिटल'मध्ये पाठवण्यात आले. केईएम रुग्णालयाच्या आयसीयूमध्ये २४ तास ठेवल्यानंतर त्याला मृत घोषित करण्यात आले, अशी माहिती मुमतरीनच्या कुटुंबीयांनी शुक्रवारी (दि.२९) 'ससून जनरल हॉस्पिटल'च्या शवविच्छेदन गृहाबाहेर दिली. तिथे त्या निष्पाप बालकाचे शवविच्छेदन सुरू होते.

कुटुंबाने असा आरोप केला आहे की, सिटी केअर हॉस्पिटलमध्ये प्रसूतीच्या वेळी मुख्य डॉक्टर हजर नसून केवळ साहाय्यक डॉक्टरच उपलब्ध होते. त्यांनी मुमतरीनला वेळेत सह्याद्री सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये हलवले नाही, ज्यामुळे तिचा मृत्यू झाला. याशिवाय, प्रसूतीदरम्यान 'व्हॅक्यूम एक्स्ट्रॅक्शन' या पद्धतीचा वापर केल्यामुळे नवजात बाळाला गंभीर दुखापत झाली, असाही दावा कुटुंबाने केला आहे.

## बसथांबे, आगारांवरील जाहिरातींमध्ये कोट्यावधींचा घोटाळा? व्यवस्थापकीय संचालकांकडून चौकशीचे आदेश

पुणे (दै. संध्या)

पुणे महानगर परिवहन महामंडळाकडून (पीएमपीएमएल) शहरातील ८६५ स्टेनलेस स्टील बसथांबे आणि १० बस आगारांवर जाहिरात करण्यासाठी देण्यात आलेल्या निविदेमुळे 'पीएमपी'चे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केला आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याचा आदेश व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांनी दिला आहे.

हे काम तातडीने रद्द करण्याची मागणी मनसेचे प्रदेश सरचिटणीस हेमंत संभूस यांनी केली. याबाबतचे निवेदन संभूस यांनी पीएमपीएमएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड यांना दिले.

"पीएमपी'च्या थांब्यांवर जाहिरात करण्यासाठी निविदा मागविण्यात आली. या कामासाठी नियमानुसार किमान तीन निविदा येणे आवश्यक होते. मात्र, एकाच ठेकेदाराची निविदा मंजूर करण्यात आली. निविदेच्या अटींनुसार प्रत्येक थांब्यासाठी किमान १२ हजार रुपये भाडे येणे अपेक्षित




होते. मात्र, पीएमपीच्या संचालक मंडळाने केवळ ७ हजार रुपये भाडे मान्य केले. त्यामुळे मंडळाचे प्रत्येक महिन्यात ४३ लाख २५ हजार रुपयांचे नुकसान होत आहे. या ठेकेदाराबरोबर झालेल्या पाच वर्षांच्या कराराप्रमाणे पीएमपीचे सुमारे २५ कोटी ९५ लाख रुपयांचे नुकसान पीएमपीएमएलला सोसावे लागणार आहे,' असे संभूस यांनी सांगितले.

'शहरात ३५० हून अधिक बसथांब्यांवर बेकायदा रोषणाई करण्यात आली आहे. यासाठी महापालिकेच्या आकाशचिन्ह आणि पथ विभागाची परवानगी घेण्यात आलेली नाही. त्याचे शुल्कही भरण्यात आले नाही,' असा आरोप संभूस यांनी करून याबाबत निर्णय न घेतल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत व्यवस्थापकीय संचालक महेश आव्हाड म्हणाले,'गेल्या दीड वर्षांपूर्वी 'पीएमपी'च्या थांब्यांवर, आगारांवर जाहीरात करण्यासाठी निविदा काढण्यात आली. त्यानुसार संबंधित कंत्राटदाराने कामही सुरू केले. आता या प्रकरणाची संपूर्ण चौकशी केल्याशिवाय निविदा रद्द करता येत नाही. कंत्राटदाराकडून काही चूक झाली असेल तर योग्य कारवाई करण्यात येईल. आवश्यक तिथे दंडही आकारण्यात येईल. त्यासाठी या संपूर्ण प्रकाराची सखोल चौकशी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत. ही निविदा प्रक्रिया कशी झाली, याची माहिती घेण्यात येईल. त्यानंतर योग्य ती कार्यवाही केली जाईल.'

## तीन वर्षात 'थिएटर कमांड'; कशी असेल भारतीय लष्कराची नवी रचना ? देशाच्या लष्करप्रमुखांनीच दिली माहिती!

पुणे (दै. संध्या)

'तीनही सैन्यदलांत समन्वय राखण्यासाठी राबवण्यात येत असलेली 'थिएटरायझेशन'ची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून, येत्या दोन-तीन वर्षात सैन्यात 'थिएटर कमांड' असित्त्वात येताना दिसतील,' असा विश्वास देशाचे लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांनी शनिवारी व्यक्त केला.

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या (एनडीए) दीक्षांत संचलनानंतर द्विवेदी यांनी पत्रकारांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. लष्कराच्या दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल संदीप जैन, 'एनडीए'चे प्रमुख व्हाइस ॲडमिरल अनिल जग्गी, उपप्रमुख एअर व्हाइस मार्शल राजेश वर्मा या वेळी उपस्थित होते.



थिएटरायझेशनच्या रखडलेल्या प्रक्रियेविषयी बोलताना द्विवेदी म्हणाले,'थिएटरायझेशनबाबतच्या सर्व चर्चा चीफ्स ऑफ स्टाफ कमिटीमध्ये पूर्ण झाल्या असून, त्याचा अहवाल संरक्षण मंत्र्यांकडे सादर करण्यात आला आहे. सध्या विविध पातळींवर त्याचा आढावा घेण्यात येत आहे.'

'तिन्ही सैन्यदलांमध्ये समन्वय साधताना संबंधित अधिकाऱ्यांना तडजोडीची भूमिका घ्यावी लागणार आहे. त्यामुळे सैन्याची उभारणी, प्रशिक्षण आणि देखभालीची जबाबदारी सैन्यदल प्रमुखांकडे, तर मोहीमेवेळी तीन्ही दलांमधील समन्वयाची, प्रत्यक्ष कारवाईची जबाबदारी थिएटर कमांडरवर असेल, अशी रचना नव्याने करण्यात येत आहे. देशाच्या नवीन लष्करप्रमुखांच्या नेतृत्वात येत्या दोन ते तीन वर्षांत ही व्यवस्था प्रत्यक्षात पाहायला मिळेल,' असेही त्यांनी नमूद केले. 'ऑपरेशन सिंदूर २.०'कडे लक्ष वेधले असता द्विवेदी म्हणाले,'सध्या प्रत्यक्ष युद्धावर तात्पुरती बंदी आहे. मात्र ऑपरेशन सिंदूर अजून संपले नाही. आता लष्कर, नौदल आणि हवाई दल मिळून 'ऑपरेशन सिंदूर'च्या दुसऱ्या टप्प्यासाठी सज्ज होत आहेत.'

'प्रत्येक जवानाच्या हातावर ड्रोन म्हणजेच 'ईगल ऑन द आर्म'साठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आता बदलत्या युद्ध काळात सैन्यातील प्रत्येक जवानाला 'ड्रोन' उडवण्याची, ते हाताळण्याबरोबरच 'ड्रोन' प्रतिरोधक तंत्राचे कौशल्यही आत्मसात करण्याची गरज आहे. आता 'एनडीए'च्या अभ्यासक्रमातूनही ड्रोन हाताळण्याचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. त्यासाठी अकादमीत ड्रोन, सिम्युलेटर आणि आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यात येत आहे,' असेही द्विवेदी यांनी सांगितले.

# पोलिस टपऱ्यांवरील कारवाईत मग्न झाल्याने त्यांना 'मृत्यूचा बाजार' दिसेना!

पुणे (दै. संध्या)

शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्याच्या नावाखाली पुणे पोलिसांकडून गेल्या काही दिवसांपासून रात्री दहा नंतर खाऊ गल्ली, टपऱ्या, हातगाड्या, पानटपऱ्या आणि लहान खाद्य व्यवसायांवर मोठ्या प्रमाणात कारवाई केली जात आहे. मात्र, दुसरीकडे हडपसर परिसरात गेली दोन दशके सुरू असलेला कथित हातभट्टी दारूचा अवैध व्यवसाय पोलिसांना दिसला नाही का, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. एका बाजूला रात्री उशिरा खाद्यपदार्थ विकणाऱ्या लहान व्यावसायिकांवर धडक कारवाई केली जाते; मात्र दुसऱ्या बाजूला नागरिकांच्या जिवाशी खेळणारा अवैध दारू व्यवसाय वर्षानुवर्षे सुरू राहतो, यावरून पोलिसांच्या प्राधान्यक्रमावर प्रश्न उपस्थित होत आहेत.

पदपथ, रस्त्यावरील हातगाड्या, स्टॉल, ठेले, तसेच लहान खाद्यपदार्थ विक्रेत्यांना रात्री दहा वाजेपर्यंत व्यवसाय बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अनेक भागांत पोलिसांकडून नाकाबंदी, वाहन तपासणी आणि अचानक धाडी टाकल्या जात आहेत. काही ठिकाणी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या खाद्य व्यवसायांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्यामुळे हजारो लहान व्यावसायिकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला असून, व्यापाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. पोलिस आयुक्तांनी परवानाधारक रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्सना नियमानुसार सुरू ठेवण्यास परवानगी असल्याचे स्पष्ट केले होते, तरीदेखील अनेक भागांत स्थानिक पोलिसांकडून सरसकट कारवाई करून दुकाने



आणि हॉटेल्स बंद करण्यात येत असल्याच्या तक्रारी पुढे आल्या आहेत. अशातच हडपसर आणि काळेपडळ परिसरात मिथेनॉल मिसळलेली गावठी दारू पिऊन पाचपेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. अनेकांची प्रकृती गंभीर झाल्याचेही समोर आले आहे. या घटनेनंतर परिसरात सुरू असलेल्या हातभट्टी दारू विक्रीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पांढरे वस्ती परिसरात गेल्या वीस वर्षांपासून खुलेआम हातभट्टी दारू विक्री सुरू आहे. दिवसरात्र सुरू असलेल्या या व्यवसायाबाबत अनेकदा तक्रारी करूनही प्रभावी कारवाई झाली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या अवैध धंद्यामुळे परिसरात गुन्हेगारी, भांडणे, मारामाऱ्या आणि महिलांना होणारा त्रास वाढला आहे. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली असून, तरुण व्यसनाधीन होत असल्याची खंतही नागरिकांनी व्यक्त केली. एवढेच नव्हे, तर काही शाळकरी मुलांपर्यंतही या व्यसनाचा प्रभाव पोहोचत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तरीदेखील संबंधितांवर कठोर कारवाई होत नसल्याने पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. हातभट्टी दारू विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार होत असल्यानेच या व्यवसायाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आले का, अशी चर्चा परिसरात रंगली आहे. काही नागरिकांनी तर पोलिस आणि अवैध धंदे चालविणाऱ्यांमधील कथित आर्थिक साटेलोटे असल्याचा गंभीर आरोप केला आहे. मात्र, याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी, हातभट्टी दारू विक्रीला संरक्षण देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच मिथेनॉलयुक्त दारूमुळे झालेल्या मृत्यूंसाठी जबाबदार असलेल्या सर्व संबंधितांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिकांनी केली आहे. दरम्यान, या प्रकरणानंतर पोलिसांकडून काही संशयितांना ताब्यात घेऊन तपास सुरू करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या अवैध व्यवसायाकडे आतापर्यंत दुर्लक्ष का झाले, याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेच्या ट्रायलमध्ये विनेश फोगाटचा एकतर्फी विजय

**मुंबई (दै. संध्या)**



भारतीय महिला कुस्तीपटू विनेश फोगाट हिने आशियाई क्रीडा स्पर्धेच्या निवड चाचण्यांमध्ये शानदार सुरुवात करत पहिल्याच सामन्यात ज्योतीचा 7-1 अशा फरकाने पराभव केला. दीर्घ काळानंतर स्पर्धात्मक कुस्तीमध्ये पुनरागमन करत असलेल्या विनेशकडे सर्वांचे लक्ष लागले होते आणि तिने आपल्या अनुभवाच्या जोरावर विजय मिळवत पुढील फेरीत प्रवेश केला. आशियाई क्रीडा स्पर्धेच्या ट्रायलमध्ये विनेश फोगाटचा एकतर्फी विजय सामन्याच्या सुरुवातीला विनेश काहीशी सावध दिसत होती. तिने प्रतिस्पर्ध्याचा अंदाज घेत उभी राहून खेळावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या काही मिनिटांत दोन्ही खेळाडूंमध्ये चुरशीची झुंज पाहायला मिळाली. मात्र, विनेशने नंतर 'पुश पॉइंट' मिळवत खाते उघडले. त्यानंतर तिने प्रतिस्पर्ध्याच्या दोन्ही पायांवर आक्रमण करण्याचा प्रयत्न केला, पण त्यातून तिला गुण मिळवता आले नाहीत. दुसऱ्या पीरियडमध्ये मात्र विनेशने आपली लय पकडली. क्लॉकवर ठेवण्यात आल्यानंतर तिने अधिक आक्रमक भूमिका घेतली. उजव्या पायावर अचूक हल्ला करत ज्योतीला खाली पाडले आणि 3-0 अशी आघाडी घेतली. ज्योतीनेही पुनरागमनाचा प्रयत्न करत विनेशच्या पायावर हल्ला चढवला, मात्र अनुभवी विनेशने तो डाव सहज हाणून पाडला. त्यानंतर तिने वेगवान आणि अचूक चालींचा वापर करत सलग गुण मिळवले आणि स्कोअर 7-0 असा केला. अखेरीस ज्योतीला एक पुशआऊट गुण मिळाला, पण तोपर्यंत सामना विनेशने जिंकला होता. दरम्यान, अधिकृत वजनमापनावेळी मोठा वाद निर्माण झाला. सुरुवातीला अधिकाऱ्यांनी विनेशला फक्त 50 किलो वजनी गटातच खेळण्याची परवानगी दिली होती. कारण तिच्या मागील काही आंतरराष्ट्रीय स्पर्धा, त्यात पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेचाही समावेश आहे, तिने 50 किलो गटात खेळल्या होत्या. मात्र विनेशने या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवत 53 किलो गटात खेळण्याची इच्छा व्यक्त केली.

# सख्ख्या भावानेच दिली जीवे मारण्याची धमकी

**बीड (दै. संध्या)**

■ पोलिसांत तक्रार



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाने आता आणखी एक धक्कादायक वळण घेतले आहे. या खटल्यातील एक प्रमुख साक्षीदार असलेल्या दादा खिंडकर यांना साक्ष मागे घेण्यासाठी चक्क त्यांच्या सख्ख्या भावानेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब समोर आली आहे. या प्रकरणी बीडच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. या घटनेमुळे बीडमध्ये एकच खळबळ माजली आहे.

दादा खिंडकर हे मृत सरपंच संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचे साडू आहेत. तसेच या प्रकरणातील एक प्रमुख साक्षीदारही आहेत. आता त्यांना त्यांचा छोटा भाऊ समाधान खिंडकर यांनी साक्ष न देण्यासाठी जीवे मारण्याची धमकी दिल्याची बाब समोर आली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, समाधान खिंडकर हे नुकतेच दादा खिंडकर यांच्या घरी आले होते. त्यांनी तिथे जुन्या वादाची खपली काढत दादा खिंडकला सांगितले की, तू धनंजय देशमुख यांच्यासोबत राहू नकोस. संतोष देशमुख प्रकरणात साक्षही देऊ नकोस. उलट त्यांना हे प्रकरण मिटवून घ्यायला सांग. समाधान खिंडकर यांच्या या सूचनेमुळे दादा खिंडकर यांनी त्यांना या प्रकरणापासून दूर राहण्याचा व आपले काम करण्याचा सल्ला दिला. पण समाधान यांनी दादा खिंडकर यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनाक्रमानंतर दादा खिंडकर यांनी तात्काळ शिवाजी नगर पोलिस ठाणे गाठून झाल्या प्रकाराची तक्रार दाखल केली. पोलिसांनीही यासंबंधी वेळ न दवडता तात्काळ अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली. विशेष म्हणजे प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार दादा खिंडकर व आरोपी समाधान खिंडकर या दोन्ही भावांत गत अनेक दिवसांपासून कौटुंबिक व इतर कारणांवरून वाद सुरू आहे. यापूर्वी दादा खिंडकर यांच्यावरही काही तरुणांना मारहाण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. पण आता संतोष देशमुख हत्या प्रकरणाती साक्ष बदलण्यासाठी त्यांच्या लहान भावानेच त्यांना धमकी दिल्यामुळे आता या प्रकरणाला वेगळे वळण मिळण्याची शक्यता आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे बीड जिल्हा गत काही वर्षांपासून गुन्हेगारी कारवायांमुळे चांगलाच चर्चेत आला आहे. जिल्ह्यात गत आठवड्यातच एका राजकीय पुढाऱ्याच्या मुलाने विवाहित महिलेला ब्लॅकमेल करून तिच्यावर वारंवार अत्याचार केल्याची घटना उजेडात आली होती. पीडित महिला बीडच्या चऱ्हाटा रोड भागात राहत होती. सध्या ती नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथे वास्तव्यास आहे. तिच्या तक्रारीनुसार, अमर बांगर नामक आरोपीने तिला ब्लॅकमेल करून तिच्यावर अत्याचार केला. आरोपी अमर बांगर हा जिल्ह्यातील एका मोठ्या राजकीय पुढाऱ्याचा निकटवर्तीय असणाऱ्या व्यक्तीचा मुलगा आहे. पोलिसांनी त्याच्यावर बलात्कार, खंडणी व गुंगीचे औषध देऊन लैंगिक शोषण केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपी सध्या फरार आहे.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## ढिंग-टांग





## थोडक्यात पण महत्वाचे...

### भिवंडी एसटी स्टँडचा पुनर्विकास होणार; ₹14.18 कोटी निधी राज्य सरकारकडून मंजूर




भिवंडी (दैनिक संध्या) : भिवंडीच्या अत्यंत जीर्ण झालेल्या एसटी स्टँडच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य सरकारने स्टॅन्डच्या पुनर्बांधणीसाठी १४.१८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. स्टॅन्डच्या काम केव्हा सुरू होईल हे सांगणे कठीण असले तरी, हा निधी मिळवण्यासाठी लोकप्रतिनिधींमध्ये चढाओढ सुरू आहे. भिवंडी एसटी स्टँडचे उद्घाटन २० मार्च १९७२ रोजी झाले. त्याच्या बांधकामाला सुरुवात होऊन ५४ वर्षे झाली आहेत. एसटी कॉर्पोरेशनच्या देखभालीच्या अभावामुळे संपूर्ण इमारत पडझडीच्या अवस्थेत आली आहे. देखभालीच्या अभावामुळे इमारतीचे स्लॅब वारंवार कोसळतात. खांबांना तडे गेले असून त्यातून लोखंडी सळ्या उघड्या पडल्या आहेत. स्टँडच्या परिसर खड्ड्यांनी भरलेला आहे. पावसाळ्यामध्ये या बस स्टॅन्डला पूर भरण्याचे दृश्य पाहायला मिळते.या इमारतीचे मजले जीर्ण अवस्थेत असल्याने स्टेशनपर्यंत पोहोचणे अवघड झाले आहे. रोज प्रवास करणारे प्रवासी, बस कंडक्टर आणि चालक यांना भीतीच्या छायेत जगावे लागत आहे. काही वर्षांपूर्वी महानगरपालिकेने एसटी डेपोची इमारत धोकादायक घोषित केली होती. तेव्हापासून, राज्य सरकारकडे तिच्या पुनर्बांधणीची मागणी केली जात आहे. अखेरीस, राज्य सरकारने १४.१८ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. प्रत्यक्ष मंजुरी ते नवीन बस स्टॅन्ड उभे राहण्यापर्यंतची प्रतीक्षा मात्र रोज प्रवास करणाऱ्या प्रवाशांना अत्यंत क्लेशदायक ठरणार आहे.

### शिवाजी बापू मोरे यांचे निधन



जेजुरी (दैनिक संध्या) : बारामती तालुक्यातील गुणवडी जवळील मोरे वस्ती येथील शेतकरी शिवाजीबापू भगवान मोरे वय 70 यांचे अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या मागे आई, पत्नी एक मुलगा, तीन मुली सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अंत्यविधी वेळी ग्रामस्थांच्या वतीने कै शिवाजी बापू मोरे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

### मुख्याध्यापक वागदरे सेवानिवृत्त



नारायणगाव (दैनिक संध्या) : ग्रामविकास मंडळ संचालित हिवरे तर्फे नारायणगाव कुलस्वामी खंडेराय विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.तबा जी वागदरे सर हे आज सेवा निवृत्त झाले.तब्बल ३२ वर्षे मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी सांभाळत असतानाच विद्यालयाच्या १०० टक्के निकालाची परंपरा देखील श्री. वागदरे सरांनी कायम जपली.आज त्यांच्या सेवा निवृत्ती नंतर त्यांना पदभार मुक्त करण्यात आले.खरं तर हा क्षण अत्यंत हळवा आणि भावूक होता. श्री. वागदरे सर देखील यावेळी भाऊक झाले होते.श्री.अशोक चौधरी सरांनी सेवा ज्येष्ठतेनुसार मुख्याध्यापक पदाचा पदभार स्वीकारला. ग्रामविकास मंडळाचे सर्व पदाधिकाऱ्यांनी श्री. अशोक चौधरी सरांना शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले तर श्री. वागदरे सरांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. महत्त्वाची सूचना - श्री. तबाजी वागदरे सरांचा सेवा निवृत्त समारंभाचे आयोजन रविवारी दि.२१ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता कुलस्वामी खंडेराय विद्यालयात आयोजित करण्यात आला आहे.श्री.वागदरे सरांना निरोप देण्यासाठी कृपया सर्व ग्रामस्थांनी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित रहावे ही विनंती..!

# शानाया चुकून राशीसाठी रचलेल्या घातक सापळ्यात अडकते

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

सोनी सबवरील लोकप्रिय कौटुंबिक ड्रामा पुष्पा इम्पॉसिबल आपल्या भावनिक कथाकथनाने, नात्यांच्या बंधांनी आणि प्रेक्षकांच्या मनाला भिडणाऱ्या क्षणांनी सतत मन जिंकत आहे. नेहमीच आयुष्याने दिलेल्या प्रत्येक आव्हानाला सामोरे जाणारी पुष्पा (करुणा पांडे) आता एका तीव्र आणि भावनिक ट्रॅकसाठी सज्ज होत आहे, ज्यामुळे पटेल कुटुंब हादरून जाईल. आगामी भागांमध्ये, बापोदरा चाळमध्ये राशीची (अक्षया हिंदाळकर) गोदभराई मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. कुटुंब एकत्र येऊन हा सोहळा खास बनवतो. पण या आनंदात शांतपणे धोका प्रवेश करतो. दिलीप पटेल (जयेश मोरे) वर सूड उगवण्यासाठी संतोष राशीला दुखावण्याचा कट रचतो. धक्कादायक वळणात, राशीसाठी ठेवलेला विधीचा मुकुट विषारी बनवला जातो. मात्र, राशी तो घालण्याआधीच शानाया नकळत तो डोक्यावर ठेवते आणि आनंदाचा सोहळा एका क्षणात भीती आणि गोंधळात बदलतो. शानायाची भूमिका साकारणारी मुस्कान बामने म्हणाली, "शानाया फक्त मदत करायला आली होती, तिला अजिबात कल्पना नव्हती की ती अशा सापळ्यात अडकणार आहे. हा सिक्वेन्स शूट करताना खूप तीव्र होता कारण काही क्षणांतच शानाया आणि संपूर्ण चाळीसाठी सगळं बदलतं. एका क्षणी सगळे आनंद साजरा करत असतात आणि पुढच्या क्षणी गोंधळ आणि घबराट पसरते. मला वाटतं आयुष्य एका क्षणात बदलू शकतं, जेव्हा आनंद अचानक अनपेक्षित भीतीत बदलतो. त्यामुळे हे भाग सादर करताना भावनिकदृष्ट्या खूप ताकदीचे वाटले."



# सेवेतून मे २०२६ अखेर ८८ अधिकारी-कर्मचारी सेवानिवृत्त

## आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते सन्मान समारंभ उत्साहात संपन्न

**पिंपरी (दै. संध्या) :**




पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेतून नियत वयोमानानुसार तसेच स्वेच्छानिवृत्ती स्वीकारलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि कर्तव्यभावनेतून दिलेले योगदान संस्थेच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरले आहे, अशा शब्दांत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली तसेच यापुढे सेवानिवृत्त अधिकारी,कर्मचा-यांना सेवानिवृत्तीच्या दिवशीच सेवानिवृत्ती वेतन आदेश व देय रकमेचा लाभ देण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिका-यांना केल्या.

महानगरपालिकेच्या वतीने संत तुकारामनगर येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे आयोजित करण्यात आलेल्या सन्मान समारंभात मे २०२६ अखेर नियत वयोमानानुसार ७२ तसेच स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या १६ अशा एकूण ८८ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, उप आयुक्त तानाजी नरळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष बबन झिंजर्डे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, महापालिकेतील प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याने आपल्या कार्यकाळात जबाबदारीची जाणीव ठेवून उत्कृष्ट सेवा बजावली आहे. सेवानिवृत्तीनंतरचा काळ हा आयुष्यातील नवीन पर्व असतो. या काळात समाजकार्यात सक्रिय सहभाग घेत आनंदी, समाधानकारक आणि आरोग्यपूर्ण जीवन जगावे. तसेच कुटुंबीयांनीही त्यांना सन्मानपूर्वक वागणूक देऊन त्यांच्या योगदानाचा आदर करावा.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम म्हणाले, सेवानिवृत्ती ही केवळ शासकीय प्रक्रियेपुरती मर्यादित असते, मनातील सेवाभाव कधीही निवृत्त होत नाही. अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आजवर जपलेली लोकसेवा, कर्तव्यनिष्ठा आणि अनुभव याचा लाभ पुढील पिढीला मिळावा. शहराच्या विकास प्रक्रियेत मार्गदर्शक म्हणून त्यांनी पुढेही योगदान द्यावे.

# आरक्षण उपवर्गीकरणाची तात्काळ अंमलबजावणी करा

**अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा : अनुसूचित जातींमधील ५९ घटकांना न्याय्य पद्धतीने आरक्षणाचा लाभ मिळावा**

**पुणे (दै. संध्या) :**




अनुसूचित जातींमधील ५९ घटकांना न्याय्य पद्धतीने आरक्षणाचा लाभ मिळावा यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आरक्षण उपवर्गीकरणाच्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी, अशी मागणी पुणे शहर जिल्हा मातंग समाजाच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. तसेच कोणत्याही समाजातील महापुरुषांविषयी अपमानास्पद वक्तव्य करणाऱ्यांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या पत्रकार परिषदेला माजी मंत्री दिलीप कांबळे, सुभाष जगताप, आमदार अमित गोरखे, अविनाश बागवे, विष्णू कसबे, शंकर तडाखे, पुणे शहर जिल्हा मातंग समाजाचे सचिव दीपक कसबे यांच्यासह समाजाच्या कोअर कमिटीचे सदस्य विकास सातारकर, भास्कर नेटके, डॉ. संपत जाधव, सुनील खंडागळे, सचिन जोगदंड, शंकर शेंडगे, ॲड. महेश सकट, संजय केंजळे, दयानंद आढागळे, लक्ष्मण तांदळे आणि समाजातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्यास मान्यता दिली असून त्यामुळे आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत अधिक समतोल आणि न्याय्य पद्धतीने पोहोचू शकतो. मात्र, शासनाकडून अद्याप या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झालेली नसल्याने समाजामध्ये नाराजी वाढत आहे. त्यामुळे शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

माजी मंत्री दिलीप कांबळे यांनी आपल्या भाषणात समाजातील महापुरुषांचा अवमान करणाऱ्या व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. अशा घटनांमुळे सामाजिक सलोखा बिघडण्याची शक्यता असून प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, असे त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

**उपविभागीय दंडाधिकारी हवेली, उपविभाग पुणे यांचे कार्यालय**

७. निलगिरी बंगला, राणीचा बाग, अल्पवयत भवनमागे, पुणे-४११००१

दुरध्वनी क्र. ०२०-२६३३०८३२ | Email-sdopune@gmail.com

क्र. मृत्यु/रजि./एसआर/१०१/२०२५ | दिनांक:- २५/५/२०२६

१) श्री लोले हेमंत गणपत
रा सांगवी सांडस ता हवेली जि पुणे — अर्जदार

विरुध्द

२) जन्म-मृत्यु नोंदणी अधिकारी / निबंधक,
ग्रामपंचायत सांगवी सांडस — जाबदेणार

विषय : जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) नुसार

जाहीर नोटीस देण्यात येते की, वरील नमूद किरकोळ फौजदारी अर्जातील अर्जदार श्री लोले हेमंत गणपत रा सांगवी सांडस ता हवेली जि पुणे (अपिलार्थी) यांनी त्यांचे आजी रेऊबाई हरिभाऊ लोले, यांचा, मृत्यु दि.२.०३.२००९ रोजी मौजे सांगवी सांडस येथे झाला आहे. सदर मृत्युची नोंद झाली नसल्याने या न्यायालयात जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) प्रमाणे मृत्युची नोंदणी करण्याचा आदेश मिळणेबाबत या न्यायालयात किरकोळ अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जास कोणाची काही कायदेशीर हरकत असल्यास त्यांनी सदरची जाहीर नोटीस प्रसिध्दी झाल्यापासून १५ दिवसाच्या आत या न्यायालयात स्वताः अथवा आपले वकिलामार्फत हजर राहून आवश्यक त्या पुराव्याचे कागदपत्रांसह आपले लेखी म्हणणे मांडावे. सदर कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर अर्जदारास कोणाचीही हरकत नसल्याचे समजून पुढील हुकूम करणेत येईल याची नोंद घ्यावी.


सदरची जाहीर नोटीस आज दि. २५/५/२०२६ रोजी माझे सहीने व शिक्क्यानिशी दिली असे.

शिक्का

सही/-
(डॉ. यशवंत माने)
उपविभागीय दंडाधिकारी, हवेली
उपविभाग पुणे

# डॉ. वाणी यांनी डॉ. देव यांचा प्रस्ताव पुन्हा साकारला

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**



सोनी सबवरील यादें आपल्या भावनिक कथाकथनाने, हलक्या क्षणांनी आणि डॉ. देव मेहता (इकबाल खान) यांच्या आठ वर्षांची स्मृती गमावल्यानंतर स्वतःला पुन्हा शोधण्याच्या प्रवासाने प्रेक्षकांना जोडून ठेवत आहे. डॉ. देव अजूनही आपल्या भूतकाळाच्या तुकड्यांशी झुंज देत असताना, अलीकडील एका क्षणाने डॉ. वाणी (सृष्टी सिंह) ला नव्या आशेची किरण दिला आहे.

आगामी भागांमध्ये, रुग्णालयात गूढ वैद्यकीय प्रकरणं आणि आव्हानं सुरू असताना, डॉ. वाणी (सृष्टी सिंह) शांतपणे ही आशा धरून ठेवते की एक दिवस डॉ. देव त्यांचं आयुष्य आणि प्रेम पुन्हा आठवेल. जेव्हा डॉ. देव अचानक डॉ. वाणीशी जोडलेली एक छोटी आठवण आठवतो, तेव्हा ती ठरवते की त्याला स्मृती परत मिळवून देण्यासाठी ती शक्य ते सर्व करेल. आपल्या प्रेमावर हार न मानता, डॉ. वाणी, डिग्गी (अर्जुन पुंज) च्या मदतीने, त्यांच्या नात्यातील सर्वात सुंदर आणि अविस्मरणीय क्षण पुन्हा जिवंत करते तो दिवस जेव्हा डॉ. देवने तिला प्रपोज केले होते. त्या क्षणाचं सेटअप पुन्हा तयार करणं, त्या भावनांना पुन्हा जगणं डॉ. वाणी सर्व काही करते जेणेकरून डॉ. देवला त्यांच्यातील जुडलेपण पुन्हा जाणवेल.

हा सुंदर प्रयत्न डॉ. देवला त्याच्या आठवणींशी आणि डॉ. वाणीवरील प्रेमाशी पुन्हा जोडेल का?

आगामी ट्रॅकबद्दल बोलताना सृष्टी सिंह म्हणाली, "डॉ. वाणीने खूप भावनिक संघर्ष अनुभवले आहेत. कुठेतरी तिने स्वीकारलं आहे की डॉ. देव कदाचित तिला पूर्वीसारखं कधीच प्रेम करणार नाही, पण तरीही ती त्याच्या सोबत उभी राहिली आणि त्याला साथ दिली. पहिली आठवण जी परत आली ती डॉ. वाणीशी जोडलेली होती आणि त्याने तिला नव्या आशेची जाणीव दिली. मला डॉ. वाणीबद्दल सर्वात जास्त आवडतं ते म्हणजे तिचं भावनिक सामर्थ्य आणि परिपक्वता. व्यक्ती म्हणून मी स्वतः अशा परिस्थिती हाताळू शकेन का, हे मला खरंच माहित नाही. पण डॉ. वाणीची भूमिका करताना मी तिच्याकडून हे शिकले आहे."

यादें पाहण्यासाठी सज्ज व्हा दर सोमवार ते शनिवार रात्री 8 वाजता, फक्त सोनी सबवर.


महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## ई–निविदा सूचना

अधीक्षक अभियंता, महावितरण, रास्तापेठ शहर मंडल, प्रशासकीय इमारत, रास्तापेठ, पुणे – ११ कार्यालयातर्फे विविध कार्यालयासाठी पीसी '०' ग्राहकांचे सी.एम.आर.आय. मार्फत मासिक मीटर वाचन करण्याच्या कामाकरिता, जुलै–२०२६ पासून महावितरण कडे ई–नोंदणीकृत कंपन्यांकडून निविदा आमंत्रित करत आहेत. कामाचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

| क्र. | निविदा क्र. | कामाचे वर्णन | निविदा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | SE/RPUC/ T-51/2026-27 | जुलै–२०२६ पासून रास्ता पेठ शहर मंडल अंतर्गत पद्मावती विभागामधील पीसी '०' ग्राहकांच्या सीएमआरआय मार्फत मासिक मीटर वाचनाच्या कामाकरिता निविदा. | रु. २९.०० लाख |
| २ | SE/RPUC/ T-52/2026-27 | जुलै–२०२६ पासून रास्ता पेठ शहर मंडल अंतर्गत रास्ता पेठ विभागामधील पीसी '०' ग्राहकांच्या सीएमआरआय मार्फत मासिक मीटर वाचनाच्या कामाकरिता निविदा. | रु. ४०.०० लाख |
| ३ | SE/RPUC/ T-53/ 2026-27 | जुलै–२०२६ पासून रास्ता पेठ शहर मंडल अंतर्गत बंड गार्डन विभागामधील पीसी '०' ग्राहकांच्या सीएमआरआय मार्फत मासिक मीटर वाचनाच्या कामाकरिता निविदा. | रु. ३६.०० लाख |

वरील निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदर निविदा विक्रीसाठी दि. ०१.०६.२०२६ ते दि. १२.०६.२०२६ पर्यंत उपलब्ध राहतील. निविदेमधील बदल, मुदतवाढ आदी महावितरणच्या संकेतस्थळावर प्रकाशित केला जाईल. अधिक माहितीसाठी संपर्क: ७८७५७६७०१५

PRO/PZ/060/2026-27 — अधीक्षक अभियंता, रास्तापेठ शहर मंडल, पुणे.

# भोसरी उड्डाणपूल पाडू नका, गावठाणात अतिरिक्त भूसंपादन नको : महापौर रवि लांडगे

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रीय महामार्गांशी संबंधित विविध प्रलंबित प्रश्न, वाढती वाहतूक कोंडी, पावसाळ्यात निर्माण होणाऱ्या समस्या तसेच शहरातील महत्त्वाच्या विकासकामांचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांनी भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) चे प्रकल्प संचालक संजय कदम यांच्यासमवेत सविस्तर बैठक घेतली.

यावेळी महापौर रवि लांडगे यांनी शहरातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणाऱ्या विविध प्रश्नांकडे अधिकाऱ्यांचे लक्ष वेधत त्यावर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.

बैठकीत पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडी, नाशिक फाटा ते खेड उन्नत मार्ग (Elevated Corridor) प्रकल्पाची सद्यस्थिती, मुंबई-बंगळुरू महामार्गालगतच्या सेवा रस्त्यांचे रुंदीकरण, रस्त्यांची दुरुस्ती, अपघातप्रवण ठिकाणांवरील उपाययोजना, जलनिस्सारण व्यवस्था, पावसाळ्यात महामार्गावर आणि अंडरपासमध्ये साचणारे पाणी, अतिक्रमणामुळे निर्माण होणाऱ्या समस्या तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक असलेल्या विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

याशिवाय मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग परिसरात प्रस्तावित उड्डाणपूल, अंडरपास दुरुस्ती, सेवा रस्ते बांधणी व रुंदीकरण, वाहतूक सुरळीत करण्यासाठी करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांची माहितीही NHAI अधिकाऱ्यांनी महापौरांना दिली. वाकड, पुनावळे, ताथवडे, रावेत, किवळे तसेच इतर भागांतील वाहतूक आणि पाणी साचण्याच्या समस्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून संबंधित कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना महापौरांनी दिल्या.

बैठकीत भोसरी परिसराशी संबंधित दोन अत्यंत महत्त्वाचे विषय महापौर रवि लांडगे यांनी ठामपणे मांडले. भोसरी येथील विद्यमान उड्डाणपूल कोणत्याही परिस्थितीत पाडण्यात येऊ नये तसेच भोसरी गावठाण परिसरात अतिरिक्त भूसंपादन करण्यात येऊ नये, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली. विकासकामांच्या नावाखाली स्थानिक नागरिकांना कोणताही अन्याय सहन करावा लागणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापौरांनी भोसरी गावठाणातील नागरिकांच्या भावना, स्थानिक व्यापारी, रहिवासी आणि वाहतूक व्यवस्थेवर होणारे परिणाम यांचा सविस्तर उल्लेख करत विकास आणि नागरिकहित यामध्ये समतोल राखणे आवश्यक असल्याचे सांगितले. महापौरांच्या सूचनांची दखल घेत NHAI चे प्रकल्प संचालक संजय कदम यांनी सर्व विषयांवर सकारात्मक भूमिका घेत आवश्यक त्या कामांना प्राधान्य देण्यात येईल तसेच महापौरांनी मांडलेल्या सूचनांवर तातडीने कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, “पिंपरी-चिंचवडकरांच्या हिताशी संबंधित कोणत्याही विषयात तडजोड केली जाणार नाही.

राष्ट्रीय महामार्गांशी संबंधित प्रश्नांमुळे नागरिकांना होणारा त्रास कमी करणे, वाहतूक व्यवस्था सक्षम करणे आणि विकासकामे वेळेत पूर्ण करणे हे आमचे प्राधान्य आहे. भोसरी उड्डाणपूल आणि गावठाण भूसंपादनाच्या विषयावर नागरिकांच्या भावना सर्वोच्च मानूनच पुढील भूमिका घेतली जाईल. शहराच्या विकासासोबतच नागरिकांचे हक्क आणि हित जपणे ही आमची जबाबदारी आहे.”

पिंपरी-चिंचवड शहरातील महामार्ग विकासकामे, वाहतूक व्यवस्थापन आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित सर्व प्रश्न मार्गी लागावेत यासाठी महानगरपालिका आणि NHAI यांच्यात सातत्याने समन्वय ठेवण्यात येणार असून, प्रलंबित कामांना गती देण्यासाठी नियमित आढावा बैठका घेण्यात येणार असल्याचेही महापौरांनी यावेळी सांगितले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### विषारी दारू प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करा, मनसेची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : फुगेवाडी, दापोडी व काळेवाडी परिसरात विषारी दारू सेवनामुळे १३ निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनेनंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत मनसे शहराध्यक्ष सचिन चिखले यांच्या नेतृत्वाखाली पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हटले आहे की, विषारी दारूमुळे झालेली ही घटना अत्यंत दुर्दैवी व संतापजनक असून मृतांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. तसेच शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ही घटना केवळ अपघात नसून अवैध दारू निर्मिती, साठवणूक आणि विक्री करणाऱ्या गुन्हेगारी टोळ्यांच्या बेकायदेशीर कारवायांचा परिणाम असल्याचा आरोप मनसेच्या वतीने करण्यात आला आहे. मनसेने या प्रकरणाची सखोल, निष्पक्ष व उच्चस्तरीय चौकशी करून विषारी दारूच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंत संपूर्ण साखळीचा पर्दाफाश करण्याची मागणी केली आहे. तसेच या रॅकेटमध्ये सहभागी असलेल्या सर्व आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. याशिवाय शहरातील अवैध दारू विक्री व हातभट्ट्यांना अभय देणाऱ्या अथवा कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची स्वतंत्र चौकशी करून त्यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. मृतांच्या कुटुंबीयांना शासनामार्फत तात्काळ आर्थिक मदत व पुनर्वसन सहाय्य मिळावे, तसेच पिंपरी-चिंचवड शहरातील सर्व अवैध दारू अड्डे उद्ध्वस्त करण्यासाठी पोलीस व राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या संयुक्त विद्यमाने विशेष धाडसत्र आणि स्टिंग ऑपरेशन राबवावे, अशी मागणी मनसेने केली आहे. भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी नियमित गस्त, धाडी आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची मागणीही यावेळी करण्यात आली. निवेदन देतेवेळी राजू साळवे, चंद्रकांत भाऊ दानवले, रुपेश पटेकर, विनोद भंडारी, अॅलेक्स अप्पा मोझस, सागर भोकरे, मनोज महाजन आणि पर्वेश शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### फुगेवाडी विषारी दारू प्रकरणात दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी चिंचवड शहरातील फुगेवाडी भागातील संजयनगर परिसरात गुरुवारी आणि शुक्रवारी विषारी दारूमुळे सुमारे दहा जणांचा संशयास्पद मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या प्रकरणी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी थेट राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधला. या संपूर्ण अवैध धंद्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या दोषी पोलीस आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना तडकाफडकी निलंबित करून त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी आक्रमक मागणी जगताप यांनी केली आहे. दरम्यान पोलिसांची बैठक घेत या प्रकरणी तातडीने कडक पावले उचलावीत अशा सूचना देखील त्यांनी केल्या आहेत. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी तातडीने फुगेवाडी येथील संजयनगर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यांनी मृत सचिन नेटके, अक्षय अवसरमल, विजय राठोड, राजेंद्र राठोड, अकबर पठाण, आणि बाबा शेख यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या कठीण काळात शासन आणि आम्ही सर्वजण मृतांच्या नातेवाईकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. आगामी काळात या सर्व पीडित कुटुंबीयांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरवण्यासोबतच शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही त्यांनी दिली. या भागात कोणत्याही रुग्णाला अचानक त्रास झाल्यास त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालय किंवा ‘वायसीएम’ रुग्णालयात दाखल करून उपचार देण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य विभागाला दिल्या आहेत. या घटनेनंतर आमदार जगताप यांनी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

## दारूकांडानंतर धक्कादायक खुलासे; ४० वर्षांपासून अवैध धंद्याचे आरोप

पिंपरी (दै. संध्या)

फुगेवाडीतील विषारी दारूकांडानंतर परिसरातील नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मृत्यूंची मालिका सुरू असतानाच पथकाने घटनास्थळी भेट दिली असता अनेक नागरिकांनी कर्नेलसिंह विरका कुटुंबीयांच्या कथित अवैध दारू व्यवसायाबाबत धक्कादायक दावे केले.

यावेळी एका स्थानिक तरुणाने आपला अनुभव सांगताना थेट दापोडी पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. तर, अनेक नागरिकांनी विरका कुटुंबीयांची परिसरात मोठी दहशत असल्याचे सांगितले. आमच्या परिसरात हा दारूचा अड्डा आजचा नाही. आम्ही लहानपणापासून तो पाहतोय. जवळपास 40 वर्षांपासून हा व्यवसाय सुरू आहे. दिवसरात्र दारूडे, भांडणे, शिवीगाळ, महिलांची गैरसोय, तरुण मुलांवर वाईट परिणाम... हे सगळं आम्ही सहन करत आलो. अनेकदा तक्रारीही केल्या; पण प्रत्येक वेळी काही ना काही कारणाने प्रकरण मिटवले जायचे, असे त्या तरुणाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

## अवघ्या ६ हजार ६०० रुपयांच्या फायद्यासाठी १८ जणांचा बळी



पिंपरी (दै. संध्या)

विषारी दारू प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. योगेश वानखेडेने अवघ्या 6 हजार 600 रुपयांसाठी 18 जणांचा जीव घेतला आहे. मिथेनॉल आणि दारू खरेदी करण्यासाठी योगेशने केलेला खर्च आणि त्याने मिथेनॉल मिक्स करुन विक्री केलेली दारू यातील फरक काढला तर 6 हजार 600 रुपयांचा येतो. कसा ते पाहुयात

विषारी दारू प्रकरणात योगेश वानखेडे, कर्नलसिंग विरखा, गुरुमित सिंग विरखा आणि राधेश्याम प्रजापती याला अटक करण्यात आली असून ८ जून पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे.

### योगेश वानखेडेने ६६०० रुपयांसाठी १८ जणांचा जीव घेतला

- योगेश वानखेडेने 210 लिटर मिथेनॉल खरेदी केलं – 17500 रुपये मोजले
- 9 मे ला ही खरेदी केली
- 23 मे ला मिथेनॉलचा प्रयोग करायचं ठरवलं
- मग 35 लिटर चे 1 ड्रम – 1900 रुपये
- याप्रमाणे 5 ड्रम – 9500 रुपयांची खरेदी केली
- 5 ड्रममध्ये 5 ड्रम पाणी मिस्क केले आणि 10 ड्रम बनवले
- या 10 ड्रममध्ये निम्म्याहून अधिक मिथेनॉल मिक्स केलं आणि त्याचे 12 ड्रम बनवले
- मिथेनॉल 17500 + 5 ड्रम दारुचे 9500 = एकूण 27000 रुपये खर्च
- प्रति ड्रम 2800 रुपये प्रमाणे 12 ड्रमची विक्री केली
- यातून 33 हजार 600 रुपये मिळाले
- खरेदीसाठी झालेला खर्च आणि विक्रीतून मिळालेले पैसे यातील फरक
- 33600 – 27500 = 6 हजार 600 रुपयांचा फायदा झाला.

## परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण तात्काळ करा

### अन्यथा ६ जूनपासून आमरण उपोषण; नगरसेविका ऐश्वर्या तरस यांचा इशारा

पिंपरी (दै. संध्या)





प्रभाग क्रमांक १६ मधील गुरुद्वारा वाल्हेकरवाडी, राऊतनगर, रावेत आणि विकासनगर परिसरातील अनेक रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून नागरिकांना दररोज वाहतूक करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या रस्त्यांचे डांबरीकरण तात्काळ करण्यात यावे, अशी मागणी नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे सहशहर अभियंता अजय सूर्यवंशी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित भागातील रस्त्यांच्या डांबरीकरणाबाबत यापूर्वी अनेकदा पाठपुरावा करूनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला जात आहे. रस्त्यांवरील खड्डे, खराब झालेला पृष्ठभाग आणि वाढती वाहतूक यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. कर भरूनही मूलभूत सुविधा मिळत नसल्याची भावना नागरिकांमध्ये असून, प्रलंबित डांबरीकरणाची सर्व कामे तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नगरसेविका ऐश्वर्या तरस यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले आहे की, रस्त्यांच्या डांबरीकरणाच्या कामांना त्वरित सुरुवात न झाल्यास ६ जूनपासून आयुक्त कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल. या आंदोलनातून नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी लढा दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच उपोषणादरम्यान कोणतीही अनुचित परिस्थिती निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नगरसेविका ऐश्वर्या तरस यांच्या या भूमिकेमुळे प्रभाग क्रमांक १६ मधील नागरिकांच्या रस्त्यांच्या प्रश्नाला पुन्हा एकदा वाचा फुटली असून, आता महापालिका प्रशासन यावर किती लवकर निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## फुगेवाडीवर दुःखाचा डोंगर; १३ मृत्यूंनी हसती-खेळती घरे उद्‌ध्वस्त

सांगवी (दै. संध्या)

दोन दिवसांपासून फुगेवाडीच्या मातीलाही पाझर फुटला आहे. एका दुर्दैवी घटनेने 13 जीवांचा बळी घेतला आहे आणि फुगेवाडीवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. 13 हसती- खेळती घरे एका क्षणात उद्‌ध्वस्त झाली असून, संपूर्ण परिसरात स्मशानशांतता पसरली आहे. आज 13 कुटुंबांवर आभाळ कोसळले आहे. कोणाचा बाप गेला, कोणाचा भाऊ गेला, तर कोणाचा काका गेला. ज्यांच्या कष्टावर घर चालत होते, ते कर्ते पुरुष काळाच्या पडद्याआड गेल्याने त्यांची पत्नी आणि लहान मुले आता पूर्णपणे निराधार झाली आहेत. आता आमचं काय होणार? हा प्रश्न विचारणाऱ्या लहानग्यांचा आक्रोश आणि बायकांचा हंबरडा पाहून उपस्थितांचे काळीज पिळवटून निघाले. फुगेवाडीकर आज इतके अगतिक झाले आहेत की, त्यांना कोणाचे सांत्वन करावे आणि कोणाच्या दुःखात सहभागी व्हावे, हेच सुचेनासे झाले आहे. आज संतप्त फुगेवाडीकरांनी लोकप्रतिनिधींना घेराव घालून एकच सवाल केला. आमच्या वस्तीच्या मध्यभागी ही दारूची दुकाने गेली अनेक वर्षे सुरू आहेत. अनेकदा तक्रारी करूनही फक्त थातूर-मातूर कारवाई केली जाते. आज 13 संसारांची राखरांगोळी झाली आहे, याला जबाबदार कोण? या दुकानांनी केवळ माणसे मारली नाहीत, तर फुगेवाडीचा आधारच हिरावून घेतला आहे.

## ईदपूर्वीच दोन घरांवर काळाचा घाला; विषारी दारूने हिरावले दोन जिवलग मित्र

सांगवी (दै. संध्या)

फुगेवाडीत आज दोन अशा घरांची राखरांगोळी झाली, जिथे सण साजरा होण्याऐवजी स्मशानशांतता पसरली होती. मंगळवारी रात्री एकाच ठिकाणी आनंदाने बसलेले पाच मित्र बुधवारी मरणाच्या दारात उभे ठाकले आणि दुर्दैवाने अकबर पठाण (52) व बाबा शेख (45) या दोन जिवलग मित्रांनी जगाचा कायमचा निरोप घेतला. ही केवळ दोन माणसांची मृत्यूची बातमी नाही, तर दोन संसारांच्या पूर्णपणे उदध्वस्त होण्याची ही कारुण्यकथा आहे. विजय राठोड, राजू राठोड, अकबर पठाण, बाबा शेख आणि राजू राजपूत हे पाच मित्र मंगळवारी एकाच वेळी एकत्र आले होते. मैत्रीच्या गप्पा रंगल्या होत्या; पण त्यांना कल्पनाही नव्हती की त्यांनी घेतलेला तो एक घोट त्यांच्या आयुष्यातील शेवटचा ठरेल. दारूच्या एका बाटलीत दडलेल्या विषाने एकापाठोपाठ एका अशा पाचही मित्रांच्या शरीरात कालवाकालव केली.

45 वर्षीय बाबा शेख सुतार काम करत होते. हातावरचे पोट, पण कुटुंबावर जीवापाड प्रेम. आई जमशेर बी (65), पत्नी शाईन शेख (35) 19 वर्षांची मुलगी मिसबा आणि 16 वर्षांचा मुलगा निजाम. आईने आणि पत्नीने अनेकवेळा विनवणी केली, नको रे दारू पिऊ, पण नियतीचे चक्र फिरले होते.

## दापोडी पोलीस ठाण्याच्या निरीक्षकांसह सहा जण निलंबित

पिंपरी (दै. संध्या)




फुगेवाडी येथील विषारी दारू प्रकरणात आतापर्यंत १० जणांचा मृत्यू झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणात कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दापोडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तपास पथकाचे प्रभारी अधिकारी तसेच चार पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याची कारवाई केली आहे. तसेच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नरेंद्र ठाकरे यांची पोलीस नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. निलंबित करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमध्ये दापोडी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे, तपास पथकाचे (गुन्हे शोध) प्रमुख फौजदार राजू भास्कर आणि कर्मचारी जयदीप सोनवणे, नवनाथ पोटे, सागर जाधव आणि विशाल काळे यांचा समावेश आहे.

फुगेवाडी परिसरात विषारी दारू सेवनामुळे मृत्यूंची मालिका सुरू असताना सुरुवातीला विविध कारणे पुढे करून प्रकरणाचे गांभीर्य कमी दाखवण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप होत आहे. मृत्यूंची संख्या वाढत असतानाही अवैध दारू विक्री आणि हातभट्टी व्यवसायाविरोधात प्रभावी कारवाई करण्यात पोलीस यंत्रणा अपयशी ठरल्याची टीका नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

या घटनेमुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित भागातील अवैध दारू व्यवसायाबाबत पूर्वीपासून माहिती असूनही वेळेवर कारवाई का करण्यात आली नाही, याबाबतही चर्चा सुरू आहे. अनेकांच्या मते, ही कारवाई आवश्यक असली तरी ती उशिरा झाल्याचे स्पष्टपणे समोर आले आहे. दरम्यान, विषारी दारू प्रकरणातील मुख्य आरोपींना कठोर शिक्षा देण्याबरोबरच शहरातील अवैध दारू विक्री, हातभट्टी अड्डे आणि संबंधित साखळीवर व्यापक मोहीम राबविण्याची मागणी जोर धरत आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अशा बेकायदेशीर धंद्यांवर कायमस्वरूपी लगाम लावण्यासाठी कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाईची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावरून प्रवीण जैन यांची उचलबांगडी; सत्यवान उबाळे यांच्याकडे धुरा

पिंपरी (दै. संध्या)



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वर्तुळात खळबळ उडवून देणाऱ्या ६० कोटी रुपयांच्या उपसूचना घोटाळा प्रकरणात अखेर राज्य शासनाने मोठी कारवाई केली आहे. या प्रकरणातील मुख्य सूत्रधार मानले जाणारे महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांची तडकाफडकी उचलबांगडी करण्यात आली असून, त्यांच्या जागी नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्य लेखा अधिकारी सत्यवान किशनराव उबाळे यांची ‘वित्तीय सल्लागार तथा मुख्य लेखा अधिकारी’ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने २९ मे २०२६ रोजी या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केले आहेत. महानगरपालिकेच्या मूळ अंदाजपत्रकात किंवा विकासकामांच्या नियोजनात ऐनवेळी कोट्यवधी रुपयांच्या उपसूचना घुसडून विशिष्ट कंत्राटदारांना आणि हितसंबंधियांना आर्थिक फायदा पोहोचवण्याचा डाव आखला गेला होता. हा संपूर्ण भ्रष्टाचार स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी अत्यंत आक्रमकपणे बाहेर काढला. स्थायी समितीचे सभापती म्हणून पदभार सांभाळत असताना, अभिषेक बारणे यांच्याकडे जेव्हा ६० कोटींच्या वाढीव निधीच्या उपसूचना मंजुरीसाठी आल्या, तेव्हा या फाईल्समधील तांत्रिक आणि आर्थिक तरतुदी संशयास्पद वाटल्याने त्यांनी संपूर्ण प्रकरणाची चौकशी सुरू केली.

तपासणी दरम्यान सभापती बारणे यांनी प्रशासकीय मंजुरीचे कोणतेही ठोस निकष नसताना आणि आवश्यक आर्थिक तरतूद उपलब्ध नसतानाही या ६० कोटींच्या फाईल्स नियमबाह्य पद्धतीने मंजुरीसाठी पुढे सरकवण्यात आल्याचे उघड केले. मुख्य लेखा व वित्त अधिकारी या नात्याने प्रवीण जैन यांनी या नियमबाह्य कामाला आक्षेप घेणे अपेक्षित असताना, त्यांनी कंत्राटदारांच्या फायद्यासाठी या फाईल्स मंजूर करून घेण्यामध्ये मुख्य सूत्रधाराची भूमिका बजावली. सभापती अभिषेक बारणे यांनी हा भ्रष्टाचाराचा प्रकार केवळ स्थायी समितीतच रोखला नाही, तर या संपूर्ण प्रकरणाचे पुरावे गोळा करून राज्य सरकार आणि वित्त मंत्रालयाकडे जैन यांच्याविरोधात रीतसर तक्रार दाखल केली व त्यांच्यावर तात्काळ कडक कारवाई करण्याची मागणी लावून धरली. सभापती अभिषेक बारणे यांनी पुराव्यांसह केलेल्या या तक्रारीनंतर मंत्रालयामार्फत या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्यात आली. महापालिकेच्या तिजोरीवर दरोडा टाकण्याचा आणि शासकीय नियमांना बगल देऊन कंत्राटदारांशी संगनमत करण्याचा ठपका जैन यांच्यावर ठेवण्यात आला. महापालिकेच्या आर्थिक शिस्तीचे रक्षण करण्याऐवजी भ्रष्टाचाराला खतपाणी घातल्याचे स्पष्ट झाल्यामुळे, मुख्यमंत्री आणि वित्त मंत्रालयाने जैन यांना पदावरून हटवण्याचा कठोर निर्णय घेतला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### डावा कालवा वितरिका स्तरीय पाणी वापर संस्था महासंघाची नवीन कार्यकारणी जाहीर

कवठे येमाई (दैनिक संध्या) : कुकडी प्रकल्प डावा कालवा वितरिका स्तरीय पाणीवापर संस्था महासंघ, नारायणगाव या संस्थेच्या सन २०२६-२७ या वर्षासाठी नवनिर्वाचित कार्यकारिणी गठित करण्यात आली असून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नी मागील २० वर्षांपासून सातत्याने आपल्या लेखणीतून आवाज उठविणारे वरिष्ठ पत्रकार प्रा.सुभाष अण्णा शेटे यांच्या उत्कृष्ट कार्याची दाखल घेत त्यांची महासंघाच्या तज्ञ संचालक पदी नियुक्ती करण्यात आल्याची माहिती कार्याध्यक्ष प्रकाश वायसे यांनी दिली. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार व स्वागत समारंभ नुकताच निघोज ता.पारनेर येथे उत्साहात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुकडी कालवा सदस्य प्रकाश वायसे हे होते. यावेळी महासंघाच्या विविध पदांवरील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. अध्यक्षपदी दिलीपराव मदने यांची तर कार्याध्यक्षपदी प्रकाश वायसे यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी पांडुरंग ढवळे यांची तर कार्यकारी संचालकपदी रविंद्र शिंदे व रघुनाथ निचित यांची निवड करण्यात आली. संचालक मंडळात चंद्रकांत लामखडे, अमोल कातोरे, संपतराव पानमंद, अमृताशेठ रसाळ, बाळासाहेब शिंदे,रामभाऊ शेळके, सुभाष शेटे,साहेबराव लोखंडे,प्रविण गायकवाड तर सचिवपदी अरुण सोमवंशी यांची निवड करण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांसाठी पाणी वेळेवर कसे मिळेल, पाणी पट्टी वसुली व परतावे वेळेत करणे संस्थेचे आर्थिक लेखापरीक्षण तसेच चाऱ्यांची दुरुस्ती,भराव करणे, पाणी वापर संस्थांना पाणी मिळणे तसेच जलसिंचन योजना राबवत पाण्याची बचत करण्यासाठी मार्गदर्शन करणे या साठी काम करणे आवश्यक असल्याचे मत वायसे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमास पाणीवापर संस्थांचे पदाधिकारी, चेअरमन, संचालक मंडळ सदस्य तसेच परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जुन्नर नगर परिषदेत एक कोटी 85 लाखाचा बँक घोटाळा

जुन्नर (दैनिक संध्या) : बनावट बँक खाते बनवून ठेकेदार व जुन्नर नगरपरिषदेची १ कोटी ८५ लाख ३६ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी जुन्नर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, याप्रकरणी अभिजीत पांडुरंग जाधव (वय ४७ वर्षे, राह.छ. संभाजीनगर) यांनी दि.१० मार्च २०२४ ते दि.२९ जुलै २०२५ या कालावधीत सदर घडलेल्या प्रकाराबाबत दि. २५ मे रोजी फिर्याद दिली आहे. याबाबत घडलेली घटना अशी आहे की, अभिजित जाधव यांच्या मे. बालाजी इंटरप्राईजेस संभाजीनगर या फर्मला जुन्नर शहरात ११० हायमास्ट दिवे बसविण्याचे काम नगरपरिषदेने ऑक्टोबर २०२४ मध्ये दिले होते. कामाची एकूण रक्कम ५ कोटी ८८ लाख ९९ हजार रुपये होती.सुजित घोडके यांनी हे काम मी पूर्ण करून देतो, असे सांगून जाधव यांच्यासोबत कामगार, कच्चा मालपुरवठा, कामावर देखरेख, कामाची गुणवत्ता याबाबत ठराव केले होते. दरम्यान, नगरपरिषदेने दिलेल्या कामापैकी दोन कामांची रक्कम अभिजित जाधव यांना मिळाली होती. परंतु उर्वरित काम होऊनही रक्कम न मिळाल्याने जाधव यांनी नगरपरिषदेकडे विचारणा केली असता, उर्वरित रकमेतून शासकीय वजावट करून १ कोटी ८५ लाख ३६ हजार ४४० रुपये आरटीजीएस द्वारे बँक खात्यामध्ये जमा करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ठेकेदार जाधव यांनी बँक खात्याची माहिती घेतली असता सदरचे खाते सुजित घोडके यांचे सासरे बाळासाहेब गुलाब गायकवाड यांच्या नावाने असल्याचे स्पष्ट झाले. तर, खात्याचा मोबाईल नंबर शेलार यांचा असल्याची माहिती मिळाली. आरोपींनी पुण्यातील एका बँकेत बनावट खाते उघडून तिथे वरील रक्कम फसवणूक करून वर्ग केल्याचे आढळून आल्याने जाधव यांनी जुन्नर पोलीस स्टेशन्ला फिर्याद दिली. त्यानुसार, १) सुजित भानुदास घोडके, २) बाळासाहेब गुलाब गायकवाड आणि ३) परशुराम निवृत्ती शेलार (सर्वजण राह. पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ऋषिकेश तिटमे करीत आहेत.



### कांदा दरात घसरण; आळेफाटा येथे लिलाव पाडले बंद, 2 जूनला मंचरला 'रास्ता रोको'

वडगाव आनंद (दैनिक संध्या) : कांद्याचे बाजारभाव दिवसेंदिवस कमालीचे घसरत चालल्याने संतप्त झालेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आज आळेफाटा येथील कांदा लिलाव पूर्ण दिवस बंद पाडले. कांद्याला मिळणारा कवडीमोल भाव पाहता उत्पादन खर्चही वसूल होत नसल्याने शेतकरी सध्या प्रचंड आर्थिक कोंडीत सापडला आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्र व राज्य सरकारने कांदा उत्पादकांना लवकरात लवकर आर्थिक अनुदान द्यावे आणि मोठ्या प्रमाणावर कांदा निर्यात खुली करावी, अशी जोरदार मागणी जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. आळेफाटा येथे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना आमदार सोनवणे म्हणाले की, "कांदा हे या भागातील प्रमुख पीक असून सध्या भाव नसल्याने शेतकरी देशोधडीला लागला आहे. सरकारने केवळ चालू हंगामाचा विचार न करता, गेल्या ६ महिन्यांत ज्या ज्या शेतकऱ्यांनी आपला कांदा विकला आहे, त्या सर्वांना तातडीने अनुदान दिले पाहिजे." मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती देवदत्त निकम यांनी सरकारच्या धोरणांवर कडाडून टीका केली. नाशिक जिल्ह्यासाठी १५ रुपये ८० पैसे प्रति किलो दराने कांदा खरेदीचा निर्णय सोमवारी जाहीर करण्यात आला असून तोच निर्णय संपूर्ण राज्यासाठी लागू करावा, अशी मागणी त्यांनी केली. आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी २ जून रोजी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावर मंचर येथे भव्य 'रस्ता रोको' आंदोलन करण्याचा इशारा निकम यांनी दिला. तसेच, जे लोकप्रतिनिधी या आंदोलनात सहभागी होणार नाहीत, त्यांच्या घरासमोर कडक आंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला. जुन्नर बाजार समितीचे सभापती संजय काळे यांनी सांगितले की, भाव ठरविण्याचा अधिकार बाजार समितीला नसतो. सरकारने जाहीर केलेला दीडपट हमीभाव अद्याप मिळालेला नसला, तरी आम्ही नेहमी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे आहोत. या आंदोलनाप्रसंगी निवृत्ती काळे, मंगेश काकडे, प्रीतम काळे, अनंतराव चौगुले, तुषार थोरात, माऊली खंडागळे, शेतकरी संघटनेचे संजय भुजबळ यांच्यासह जुन्नर-आंबेगाव परिसरातील शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# आंबेठाण येथे रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली निव्वळ मलमपट्टी



चाकण (दै. संध्या)

खेड तालुक्यातील आंबेठाण येथे रस्ते दुरुस्तीच्या नावाखाली फक्त रस्त्याची मलमपट्टी करण्यात आली असून, या जीवघेण्या कामामुळे नागरिकांमध्ये असंतोष खदखदत आहे.

स्मार्ट आंबेठाण येथे रस्त्याचे व खड्डे दुरुस्तीचे काम होणे अपेक्षित होते. त्यामध्ये फक्त खड्डे बुजवून रस्त्याची मलमपट्टी करण्यात आली. प्रत्यक्षात १०० मीटर संपूर्ण रस्त्याचे काम होणे अपेक्षित होते. चौकशी अंती असे समजले की संबंधित निधी अथवा प्रस्ताव अद्याप मंजूर झालेला नाही. मात्र ग्रामस्थांचा वाढता रोष आणि काही निवडक मंडळींच्या दबावामुळे संबंधित प्रशासन व पीडब्ल्यूडीला रस्त्याची तात्पुरती डागडुजी करावी लागली. सदर कामाच्या कॉन्ट्रॅक्टरने पूर्वी रस्त्याचे काम सुरू असताना संबंधित १०० मीटरचा भाग वगळून बिल मंजूर केले होते. त्याचा परिणाम म्हणजे आज तो रस्ता पूर्णतः खराब अवस्थेत पोहोचला आहे.

पुन्हा काही दिवसांत निधी येईल आणि काम पूर्ण होईल अशी माहिती दिली जात आहे. पण प्रश्न फक्त रस्ता किंवा खड्ड्यांचा नाही. त्या ठिकाणाहून जाणारा ओढा, ड्रेनेज लाईन, पाण्याचा निचरा आणि वाढती वाहतूक ही देखील अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रश्नांकडे प्रशासनाने डोळेझाक केली तर परिस्थिती आणखी भीषण होणार आहे. आंबेठाण गावात सुरू असलेल्या कामांमुळे व रस्ता बंद असल्यामुळे वासुली फाटा, आंबेठाण चौक, बिरदवडी वाय कॉर्नर ते पुणे - नाशिक महामार्ग या संपूर्ण परिसरात अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

> आंबेठाण गावची ही ठिणगी संपूर्ण परिसरात वनवा पेटवेल, आणि मग जनआक्रोश थांबवणे कोणालाही शक्य होणार नाही. रस्ता दुरुस्ती मध्ये अडथळा आणणारे पीडब्ल्यूडी, एमआयडीसी, एमएसईबी एमएनजीएल, पोलीस प्रशासन, स्थानिक ग्रामपंचायत अतिक्रमण विभाग यांच्या विरोधात जनता रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही.
>
> - अभिमन्यू शेलार, उद्योजक, आंबेठाण

उद्योग नगरीमुळे परिसरातील गावांचे स्वरूप झपाट्याने बदलले, उद्योग वाढले, लोकसंख्या वाढली. पण रस्ते, वाहतूक, ड्रेनेज आणि मूलभूत सुविधांबाबत प्रशासन अजूनही तात्पुरत्या डागडुजीवरच भर देत आहे. तात्पुरते खड्डे बुजवून जनतेची दिशाभूल करण्याऐवजी कायमस्वरूपी पर्याय, मजबूत रस्ते, योग्य ड्रेनेज व्यवस्था आणि वाहतुकीचे नियोजन तात्काळ करणे अपेक्षित आहे.

## नसरापूर चिमुकली हत्या प्रकरणात न्यायालयात साक्ष; महत्त्वाचे पुरावे सादर

नसरापूर (दै. संध्या)

नसरापूर येथे चिमुकलीवर लैंगिक अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणातील सीसीटीव्हीच्या चित्रीकरणात पीडितेला घेऊन जाणाऱ्या आरोपीला साक्षीदारांनी ओळखले. दोन साक्षीदारांनी पीडितेला आरोपीसमवेत शेवटचे पाहिल्याची साक्ष पुण्याच्या विशेष न्यायालयात नोंदवली. शुक्रवारी सुनावणीच्या पहिल्या दिवशी पाच साक्षीदारांनी साक्ष नोंदवली. त्यामध्ये पीडितेची आई, वडील, पीडितेच्या मृत्यूच्या कारणांचा पंचनामा करणारे पंच आणि आरोपीला पीडितेसमवेत पाहणाऱ्या साक्षीदारांचा समावेश आहे.

पीडितेच्या मृत्यूच्या कारणांची चौकशी करणारा पंचनामा, साक्षीदारांना बजावलेले समन्स आणि त्यांचे जबाब, एफआयआरची प्रत, पीडितेचा जन्मदाखला आदी कागदपत्रे सरकार पक्षातर्फे न्यायालयासमोर सादर करण्यात आली. तसेच छायाचित्रे, घटनास्थळावरील सीसीटीव्हीतील चित्रीकरण आदी महत्त्वाचे पुरावे मांडण्यात आले. इन्क्वेस्ट पंच, या प्रकरणातील तक्रारदार असलेली पीडितेची आई आणि वडील यांची साक्ष न्यायालयासमोर नोंदविण्यात आली.आरोपीने पीडितेचे अपहरण केल्यानंतर तिचा शोध घेणाऱ्या तीन ग्रामस्थांनीही न्यायालयासमोर साक्ष नोंदवली. या प्रकरणातील सहाव्या साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याची प्रक्रिया शनिवारी (दि. 30 मे) सुरू होणार आहे. भोर तालुक्यातील नसरापूर येथे 1 मे रोजी साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर लैंगिक व अनैसर्गिक अत्याचार करून तिची निर्घृण हत्या केल्याची घटना घडली होती. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांच्या न्यायालयात गुरुवारी आरोपीविरोधात आरोप निश्चित करण्यात आले. या खटल्यात एकूण 82 साक्षीदारांची यादी सरकार पक्षातर्फे सादर करण्यात आली आहे. त्यापैकी पहिल्या सहा साक्षीदारांची साक्ष विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी न्यायालयासमोर नोंदवली, तर बचाव पक्षातर्फे ॲड. हिंमतराव सूर्यवंशी यांनी साक्षीदारांची उलटतपासणी घेतली. आरोपीविरोधात दाखल आरोपपत्रात पुरावा नष्ट केल्याचे कलम वाढविण्याचा अर्ज सरकार पक्षातर्फे करण्यात आला.

## खडकीत महिला पोलिस अधिकाऱ्याच्या खुनाचा प्रयत्न; पतीला अटक

खडकी (दै. संध्या)



कौटुंबिक वादातून महिला पोलिस अधिकाऱ्याचा ओढणीने गळा आवळून खुनाचा प्रयत्न तिच्या पतीने केला. खडकी बाजार पोलिस वसाहतीतील अधिकारी निवासस्थानात बुधवारी (दि. 27) रात्री साडेनऊच्या सुमारास ही घटना घडली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी पती योगेश माधव बेरी (वय 38, रा. तळेगाव दाभाडे) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे. याबाबत सहायक पोलिस निरीक्षक महिलेने खडकी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

गेल्या काही महिन्यांपासून आरोपी पती महिला पोलिस अधिकाऱ्याच्या चारित्र्यावर संशय घेऊन छळ करत होता. त्याच्या छळामुळे महिला पोलिस अधिकाऱ्याने घटस्फोटाचा दावा शिवाजीनगर येथील कौटुंबिक न्यायालयात दाखल केला होता. महिला पोलिस अधिकारी खडकी बाजार पोलिस वसाहतीतील अधिकारी निवासस्थानात राहायला आहेत.

गेल्या काही दिवसांपासून आरोपी पती वेगळा राहत होता. त्याच्याकडे वसाहतीतील घराची चावी होती. एक चावी महिला अधिकाऱ्याकडे होती. 27 मे रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास महिला पोलिस अधिकारी घरी परतल्या. आरोपी पती घरात लपून बसला होता. तेव्हा आरोपीने महिला पोलिस अधिकाऱ्याच्या डोळ्यात राख फेकली.

ओढणीने त्यांचा गळा आवळला. महिला पोलिस अधिकाऱ्याने आरडाओरडा केला. तेव्हा वसाहतीतील रहिवाशांनी तेथे धाव घेतली. रहिवाशांनी मध्यस्थी करून पतीला पकडले. खुनाचा प्रयत्नप्रकरणी पतीला अटक करण्यात आली असून, पोलिस उपनिरीक्षक रेणुका गालफाडे तपास करत आहेत.

## नारायणगावकरांना करोडोंचा गंडा घालणाऱ्या प्रशांत गवळीला ठोकल्या बेड्या

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यामधील नारायणगाव येथील समर्थ क्रॉप केअर या कंपनीमार्फत इन्व्हेस्टमेंट धारकांची फसवणूक करण्यात आली आहे. अनेक गुंतवणूकदारांच्या तोंडाला पाणी पुसण्याचे काम समर्थ क्रॉप केअर या इन्व्हेस्टमेंट कंपनीने केलेले आहे .

पुणे ,अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यातील चाळीस हजाराहून अधिक गुंतवणूकदारांचे पैसे अवघ्या दहा महिन्यात दाम दुप्पट करून देतो या बोलीवर या कंपनीने घेतले आणि त्यानंतर सुरुवातीच्या काही महिन्यांमध्ये या गुंतवणूकदारांना त्यांचा हक्क देण्यात आला. परंतु त्यानंतर मात्र कंपनी दिवाळखोरीत निघाल्याचे कारण सांगून, या गुंतवणूकदारांचे पैसे देणं बंद करण्यात आले.समर्थ क्रॉप केअर चे संस्थापक अध्यक्ष प्रशांत गवळी यांनी हा संपूर्ण प्लॅन रचला .ही संपूर्ण माया गोळा केली आणि ही संपूर्ण माया गोळा करून या ठिकाणी जे इन्व्हेस्टमेंट करतायेत त्यांना काहीतरी स्टार्टअप दाखवायला पाहिजे, काहीतरी बिजनेस दाखवायला पाहिजे या दृष्टिकोनातून त्यांनी नारायणगाव येथे खडीमशीन जवळ प्रशांत गवळीने गोफार्मली नावाचा स्टार्टअप सुरू केला.

फळे, भाजीपाला या शेत मालावरती प्रक्रिया करून या ठिकाणी ती एक्स्पोर्ट इम्पोर्ट केली जातील,अशा स्वरूपात शेतकऱ्यांना भुरळ पाडली गेली. शेतकऱ्यांना येथे बोलवण्यात आले .शेतकऱ्यांना हा प्रोजेक्ट दाखवला गेला आणि हा प्रोजेक्ट पाहून शेतकऱ्यांनी आपले पैसे अगदी कुठलीही चौकशी न करता या प्रशांत गवळीच्या ताब्यात दिले .परंतु हे संपूर्ण जाळ केवळ लोकांना भूल ,थापा देण्यासाठी पसरवण्यात आलं होतं, आणि अवघ्या काही दिवसांमध्ये नारायणगाव मध्ये असणारा हा गोफार्मली ज्याच्या उद्घाटनासाठी जुन्नर ,आंबेगाव येथील अनेक मान्यवर ,बडे नेते



या ठिकाणी उद्घाटनाला आले होते. नारायणगाव, जुन्नर ,आंबेगाव परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी गोफार्मली किंवा ही समर्थक क्रॉप केअर ज्याच्यामध्ये आपली लाखो रुपयांची इन्वेस्टमेंट सुद्धा केलेली आहे. आणि त्यामुळे या संपूर्ण गुंतवणूकदारांच्या तोंडाला मात्र समर्थ क्रॉप केअर चे संस्थापक प्रशांत गवळी आणि त्यांच्या सर्व साथीदारांनी मिळून पाणी पुसलेले आहे. आज हे संपूर्ण गुंतवणूकदार चकरा मारतात, हेलपाटे मारतात ,बऱ्याचशा पोलीस स्टेशनमध्ये यांच्याविरुद्ध गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे.

अखेर त्या प्रयत्नांना यश येत प्रशांत गवळीला अटक केली असून सध्या तो पोलीस कोठडीत आहे. परंतु पूर्ण प्रक्रियेमध्ये जरी आरोपी कोठडीत असला तरी गुंतवणूकदारांना काय मिळालं .आज हे गुंतवणूकदार मागणी करतायेत की प्रशांत गवळीची असणारी संपूर्ण मालमत्ता या ठिकाणी ताब्यात घेण्यात यावी आणि आमचे पैसे आम्हाला परत करण्यात यावे. परंतु अशा स्वरूपाची कुठलीही प्रक्रिया सरकारद्वारे राबवली गेलेली नाही आणि त्यामुळे निराशे पोटी अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी गुंतवणूकदारांना या ठिकाणी पैशांची गरज आहे. ती गरज त्यांची भेटत नाही ,तो पैसा भेटत नाहीये आणि जे काही जमा केलेले पैसे होते ते या समर्थक क्रॉप केअर मध्ये गुंतवल्यामुळे आज हा पैसा नसल्यामुळे आत्महत्या करण्याची पाळी, नव्हे तर एका गुंतवणूकदाराने आत्महत्या सुद्धा केलेली आहे. आणि त्यामुळे एकंदरच ही संपूर्ण गुंतवणूकदार अडचणीत सापडलेले आहेत आणि त्यामुळे सर्व जागरूक गुंतवणूदारांनी गुंतवणूक करताना जी काही आपण गुंतवणूक करतोय ती सुरक्षित हातामध्ये करतोय का याची खात्री करावी. खऱ्या अर्थाने समर्थक क्रॉप केअर यांना कुठल्याही परवानग्या नव्हत्या सरकारी परवानगी नसताना यांनी अशा बनावट स्वरूपाचा उद्योग सुरू करून लोकांच्या, गुंतवणूकदारांच्या डोळ्यामध्ये धूळ फेकण्याचं मोठं पाप केलेलं आहे ,आणि हे पाप त्या काळात असणाऱ्या त्या प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सुद्धा झाकण्याचं काम केलेल आहे. त्यामुळे आज या कंपनीमध्ये ज्यांनी गुंतवणूक केली ते गुंतवणूकदार मात्र रस्त्यावर आलेले आहेत आणि या ठिकाणी कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या आहेत आणि त्यामुळे नेहमी सतर्क राहीले पाहिजे.

आपल्या कष्टाचा पैसा घामाचा पैसा गुंतवताना तो आपण एका चांगल्या ठिकाणी सरकारी असलेल्या योजनांमध्ये किंवा जबाबदार हातामध्ये सोपवला पाहिजे. नाहीतर अशा स्वरूपात आपल्याला पश्चाताप करण्याची वेळ येते. केवळ दहा महिन्यात आपल्याला दुप्पट पैसे भेटतील या हव्यासा पोटी आपण पैसे गुंतवले. परंतु दहा महिन्यात पैसे दुप्पट झालेच नाही ,परंतु आपले संपूर्ण पैसे खर्च होऊन आपण कर्जाच्या विळख्यात अडकले आहात. समर्थ क्रॉप केअर सारख्या अशा बनावट कंपन्यांमध्ये आपण गुंतवणूक करून आपली खूप मोठी नुकसान करून घेतलेली आहे.

## कवठे येमाईत श्री चारंगबाबा महाराज यात्रा उत्सव व भव्य बैलगाडा शर्यती उत्साहात संपन्न

कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे तीन दिवशीय श्री चारंगबाबा महाराज यात्रा उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य बैलगाडा शर्यती मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाल्या. माळवदे वस्ती, वाळुंज,वागदरे वस्ती परिसरात आयोजित या शर्यतींना पंचक्रोशीतील हजारो नागरिक, शेतकरी व बैलगाडा शौकिनांनी मोठी उपस्थिती लावली.

यात्रा उत्सवाच्या निमित्ताने पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या बैलगाडा शर्यतींमध्ये विविध गावांतील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला.

उत्कृष्ट नियोजन, शिस्तबद्ध आयोजन आणि उत्साही वातावरणामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.घाटाचा



महाराजा चा मानकरी दुर्योधन मामा शिंगाडे हे ठरले

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक रोख बक्षिसे व ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. प्रथम क्रमांकासाठी ₹५१,००१, द्वितीय क्रमांकासाठी ₹४१,००१ तर तृतीय क्रमांकासाठी ₹२१,००१ चे बक्षीस ठेवण्यात आले होते. तसेच फळीफोड स्पर्धांसाठीही विशेष बक्षिसांची व्यवस्था करण्यात आली होती. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामस्थ, युवक मंडळे, आयोजक मंडळ तसेच देणगीदारांनी मोलाचे सहकार्य केले. उपस्थितांनी बैलगाडा शर्यतींचा थरार अनुभवत पारंपरिक ग्रामीण संस्कृतीचे जतन करणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विजेत्यांचा सत्कार करण्यात आला व पुढील वर्षीही अधिक भव्य स्वरूपात यात्रा उत्सव आणि बैलगाडा शर्यती आयोजित करण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला.यावेळी बक्षीस वितरणासाठी शिरूर पंचायत समिती सदस्या कांचनताई राजेश सांडभोर, सुनील वागदरे, गुलाब वागदरे, सामाजिक कार्यकर्ते राजेश सांडभोर, आबासाहेब वागदरे, वैभव बच्चे, माजी उपसरपंच उत्तम मामा जाधव, संतोष जाधव, कैलासराव बच्चे, रामदास इचके ग्रा. पं सदस्य, रामदास माळवदे मा.ग्रा. सदस्य, बाळासाहेब जाधव व अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. वस्तीवरील सर्वच तरुण मित्र मंडळींनी यात्रोत्सव शांततेत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडावा म्हणून योग्य ते सहकार्य केल्याने यात्रोत्सव व बैलगाडा शर्यती यशस्वी वाशांतेत पार पडल्या.

## जबरदस्तीने लग्नासाठी युवकाचे अपहरण; ४ तासांत धडाकेबाज कारवाई

उरुळी कांचन (दै. संध्या)

जबरदस्तीने लग्न करण्याच्या उद्देशाने २९ वर्षीय युवकाचे अपहरण करून त्याला मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. मात्र, या प्रकरणात लोणीकंद पोलिसांनी अवघ्या चार तासांत तपासाची चक्रे फिरवत युवकाची सुखरूप सुटका केली. या कारवाईत सात आरोपींसह एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २७ मे २०२६ रोजी रात्री ९.२९ वाजण्याच्या सुमारास पुणे शहर नियंत्रण कक्षाला माहिती मिळाली की, आष्टापूर येथील एच.पी. पेट्रोल पंपाजवळ उभ्या असलेल्या पांढऱ्या रंगाच्या इर्टिगा कारमधून एका युवकाचे जबरदस्तीने अपहरण करण्यात आले आहे. याबाबत अजय लक्ष्मण बोद्रे (रा. शिंदेवाडी, ता. हवेली) यांनी पोलिसांना माहिती दिली.

घटनेची गंभीरता लक्षात घेऊन लोणीकंद पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनीता रोकडे यांनी तपास पथकाला तात्काळ घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून माहितीची खातरजमा केली असता, निलेश लक्ष्मण बोद्रे (वय २९, रा. शिंदेवाडी, ता. हवेली, जि. पुणे) यांना मारहाण करून जीवे मारण्याच्या उद्देशाने अज्ञात आरोपींनी जबरदस्तीने चारचाकी वाहनात बसवून नेल्याचे स्पष्ट झाले.

यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि विविध ठिकाणांवरील माहितीच्या आधारे तपासाला वेग दिला. पुणे पोलिसांनी बीड, नांदेड आणि परभणी येथील गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांची मदत घेत आरोपींचा माग काढला. अत्यंत कौशल्यपूर्ण तपास करत पोलिसांनी माजलगाव येथून सात आरोपी आणि एका विधी संघर्षित बालकाला ताब्यात घेतले. तसेच अपहरण झालेल्या निलेश बोद्रे यांची सुखरूप सुटका करण्यात आली.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 700 धावांचा टप्पा ओलांडणारा ठरला पहिला ‘अनकॅप्ड’ खेळाडू

मुंबई (दैनिक संध्या) : आयपीएलच्या 19 व्या हंगामात 15 वर्षांचा डावखुरा सलामीवीर वैभव सूर्यवंशी प्रत्येक सामन्यात नवनवीन विक्रम प्रस्थापित करत आहे. गुजरात टायटन्सविरुद्धच्या ‘क्वालिफायर-2’ सामन्यातही असेच काहीसे पाहायला मिळाले. न्यू चंदीगडच्या मुल्लानपूर स्टेडियमवर खेळल्या जाणाऱ्या या सामन्यात राजस्थान रॉयल्सने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. सुरुवातीला संघ अडचणीत असतानाही वैभवने एका बाजूने संयम ठेवून खेळी केली. आपल्या खेळीत त्याने जसे 20 धावा पूर्ण केल्या, तसंच त्याने आयपीएलच्या इतिहासात असा विक्रम केला जो यापूर्वी कोणताही ‘अनकॅप्ड’ (भारतीय संघासाठी न खेळलेला) खेळाडू करू शकला नव्हता. आयपीएलच्या 19 वर्षांच्या इतिहासात आतापर्यंत कोणत्याही एका खेळाडूने इतके विक्रम मोडीत काढले नसतील, जेवढे वैभव सूर्यवंशीने या एकाच हंगामात केले आहेत. वैभवने आधीच एका हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम आपल्या नावावर केला होताच, आता त्याने आणखी एक मोठी मजल मारली आहे. आयपीएलच्या इतिहासात एका हंगामात 700 पेक्षा जास्त धावा करणारा तो पहिला ‘अनकॅप्ड’ खेळाडू ठरला आहे. तसेच, आयपीएलमध्ये एका हंगामात 700 हून अधिक धावा करणारा तो एकूण 5 वा भारतीय खेळाडू ठरला आहे. त्याच्याआधी विराट कोहलीने दोनदा, तर साई सुदर्शन, सूर्यकुमार यादव आणि शुभमन गिल यांनी प्रत्येकी एकदा ही कामगिरी केली आहे. वैभवच्या फलंदाजीत सर्वाधिक धावा चौकार आणि षटकारांच्या स्वरूपात पाहायला मिळतात. त्याने याआधीच आयपीएलच्या एका हंगामात पॉवरप्लेमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम केला होता. गुजरात टायटन्सविरुद्धच्या या सामन्यात पहिल्या 6 षटकांत वैभवने 31 धावा केल्या, ज्यामुळे आयपीएलच्या इतिहासात पॉवरप्लेमध्ये 500 पेक्षा जास्त धावा करणारा तो पहिला खेळाडू ठरला आहे. आयपीएल 2026 च्या हंगामात वैभवने पॉवरप्लेमध्ये एकूण 521 धावा केल्या आहेत.

### निर्भय फलंदाजीचं गुपित उघड; सरावाच्या वेडाबद्दल केला मोठा खुलासा

मुंबई (दैनिक संध्या) : आयपीएल 2026 मध्ये राजस्थान रॉयल्सचा युवा आणि स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीने आपल्या धमाकेदार फलंदाजीने खळबळ उडवून दिली आहे. केवळ 15 वर्षांचा असताना वैभवने आयपीएलमध्ये असे अनेक मोठे विक्रम केले आहेत, जे अनेक दिग्गज खेळाडूंनाही जमलेले नाहीत. या हंगामात त्याचा फॉर्म खूप चांगला असून त्याने जसप्रीत बुमराह आणि जोश हेजलवुड सारख्या जगातील घातक गोलंदाजांविरुद्धही आक्रमक फलंदाजी करून सर्वांना थक्क केले आहे. वैभवने या मोसमात आतापर्यंत 65 षटकार ठोकले आहेत आणि आपल्या आक्रमक खेळीच्या जोरावर राजस्थानला अंतिम फेरीच्या (फायनलच्या) उंबरठ्यावर नेऊन ठेवले आहे. इतकी निर्भय फलंदाजी करण्यामागचे गुपित स्वतः वैभवनेच सांगितले आहे. त्याने एक मोठा खुलासा केला आहे की, त्याच्या आयुष्यात एक अशी गोष्ट आहे, जिच्याशिवाय तो एक दिवसही राहू शकत नाही. बिहारमधील समस्तीपूरचा रहिवासी असलेला वैभव सूर्यवंशी आता संपूर्ण क्रिकेट विश्वात चर्चेत असून तो एक सुपरस्टार बनला आहे. इथपर्यंत पोहोचण्यासाठी त्याने खूप मेहनत घेतली आहे. आपल्या यशाचे श्रेय तो वडील संजीव सूर्यवंशी यांना देतो, जे त्याला समस्तीपूरवरून पाटण्याला सरावासाठी (प्रॅक्टिस) घेऊन जात असत. वैभवने सांगितले की, जर त्याने एक दिवसही सराव केला नाही, तर त्याला वाटते की त्याचे आयुष्य जणू थांबले आहे किंवा मंदावले आहे. ‘जियोहॉटस्टार’शी बोलताना वैभव म्हणाला, आज मी जो काही आहे, तो माझ्या वडिलांमुळेच आहे. लहानपणापासून त्यांनी माझ्याकडून इतका सराव करून घेतला आहे की, जर मी एक दिवसही सराव केला नाही तर मला वाटते की माझे आयुष्य मंदावले आहे. म्हणूनच मी जास्त सुट्ट्या घेत नाही, फक्त एक दिवसाचा आराम माझ्यासाठी पुरेसा असतो. क्रिकेटप्रती वैभवचे वेड इतके आहे की, आयपीएलच्या तयारीसाठी त्याने आपल्या 10 वीच्या परीक्षाही सोडल्या होत्या.

### गुजरात आणि राजस्थानच्या क्वालिफायर-2 मध्ये दोनदा झाला टॉस

मुंबई (दैनिक संध्या) : राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यातील क्वालिफायर-२ सामना सुरू होण्यापूर्वीच एक मोठा वाद निर्माण झाला. लाईव्ह मॅचमध्ये फिक्सिंग झाले का? खरं तर हे संपूर्ण प्रकरण दोनदा टॉस (नाणेफेक) करण्याबाबतचे आहे, कोणी याला खूप मोठी चूक (ब्लंडर) म्हणत आहे, तर कोणी याला मॅच फिक्सिंग म्हणत आहे. जेव्हा पुन्हा टॉस झाला, तेव्हा राजस्थानने आधी फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. शुभमन गिलने नाणे उडवले आणि रियान परागने ‘हेड्स’ (छापा) अशी हाक दिली. नाणे खाली पडले तेव्हा ‘टेल्स’ (काटा) आले होते, नियमांनुसार GT ने टॉस जिंकला होता, पण मॅच रेफरी प्रकाश भट्ट यांनी सांगितले की रियान परागचा आवाज खूप लहान होता, त्यामुळे ते त्याची हाक ऐकू शकले नाहीत. याच कारणामुळे पुन्हा टॉस करण्यात आला. शुभमन गिलने पुन्हा नाणे उडवले, रियान परागने पुन्हा एकदा ‘हेड्स’ अशीच हाक दिली. या वेळी ‘हेड्स’ आले आणि परागने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. जेव्हा टॉस प्रेझेंटर (निवेदक) रवी शास्त्री यांनी शुभमन गिलला प्रश्न विचारले, तेव्हा गुजरातच्या कर्णधाराच्या चेहऱ्यावरची निराशा स्पष्टपणे दिसत होती. टॉस आपणच जिंकला होता, हे त्याचा चेहराच सांगत होता.

### मुंबई इंडियन्समध्ये आला इतिहासातील सर्वात मोठा वादळ

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबई इंडियन्सचा हा मोसम (सीझन) कदाचित चाहते दीर्घकाळ लक्षात ठेवतील. याचे कारण म्हणजे सातत्याने मिळालेले पराभव आणि संघातील वाढती अस्वस्थता. पाच वेळच्या चॅम्पियन संघाकडून ज्या कामगिरीची अपेक्षा होती, ती मैदानावर अजिबात दिसली नाही. १४ सामन्यांमधील १० पराभवांनंतर संघ गुणतालिकेत तळाशी घसरला. मुंबईच्या संघात संपूर्ण मोसमात ताळमेळाचा अभाव स्पष्टपणे दिसून आला. आता सर्वात मोठी चर्चा कर्णधारपदावरून (कप्तानीवरून) सुरू झाली आहे. संघामध्ये सातत्याने बैठकांचे सत्र सुरू असून, येणाऱ्या काळात मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो, असे मानले जात आहे. बातम्या अशाही आहेत की, केवळ कर्णधारपदच नाही, तर काही मोठ्या खेळाडूंच्या भूमिकेवरही पुन्हा विचार केला जाईल. मोसमादरम्यान अनेकदा असे पाहायला मिळाले की जेव्हा संघाची रणनीती मैदानावर यशस्वी ठरू शकली नाही. कोचिंग स्टाफने खेळाडूंना डेटा आणि प्लॅननुसार खेळण्याचा सल्ला दिला होता, पण अनेक प्रसंगी त्या योजनांचे पालन झाले नाही. हेच कारण होते की संघ दबावाच्या सामन्यांमध्ये वारंवार मागे पडत गेला. पॉवरप्लेमधील संथ फलंदाजी आणि गोलंदाजीतील कमकुवत सुरुवातीमुळे मुंबई इंडियन्सला संपूर्ण स्पर्धेत त्रास सहन करावा लागला. दुसरीकडे, राजस्थान रॉयल्स आणि सनरायझर्स हैदराबादसारख्या संघांनी आक्रमक क्रिकेट खेळून आपली एक वेगळी ओळख निर्माण केली. तर गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरूनी अनुभवी गोलंदाजांच्या जोरावर सलग सामने जिंकले.

# ड्रेसिंग रूममधील माहिती कोण लीक करतंय?

**मुंबई (दै. संध्या)**



पाच वेळा आयपीएलचे विजेतेपद पटकावणाऱ्या मुंबई इंडियन्स संघासाठी, यंदाचा आयपीएल हंगाम एखाद्या दुःस्वप्नापेक्षा कमी ठरला नाही. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली, मुंबई इंडियन्सला प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवण्यातही अपयश आले. शिवाय, संपूर्ण हंगामात संघाला ड्रेसिंग रूममधील अंतर्गत मतभेद आणि वादांचा सामना करावा लागला.

ड्रेसिंग रूममधील अंतर्गत कलह ही तशी काही पूर्णपणे नवीन गोष्ट नसली, तरी अशी चर्चा जोरात सुरू आहे की, रोहित शर्माकडून कर्णधारपदाची सूत्रे हार्दिक पांड्याकडे आल्यापासून मुंबई इंडियन्सच्या गोठ्यात गटबाजी आणि तणाव लक्षणीयरीत्या वाढला आहे. या पार्श्वभूमीवर, ड्रेसिंग रूममधून गोपनीय माहिती सतत बाहेर फुटत असल्यामुळे फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी नाराज असल्याचे समोर आले आहे. क्रिकेट क्षेत्रातील जाणकार आणि तज्ज्ञ गेल्या काही हंगामांतील घडामोडी पाहून आणि ड्रेसिंग रूमची गोपनीयता उघडपणे धोक्यात आलेली पाहून आश्चर्यचकित झाल्याचे बोलले जात आहे.

‘द टाइम्स ऑफ इंडिया’शी बोलताना मुंबई इंडियन्सच्या एका अधिकाऱ्याने सांगितले, “जवळपास प्रत्येक ड्रेसिंग रूममध्ये अंतर्गत मतभेद असतातच. मात्र, हार्दिकच्या पुनरागमनानंतर मुंबई इंडियन्समध्ये गटबाजी आणि कटुता एका असामान्य पातळीवर पोहोचली आहे. नक्की काय चालले आहे हे ओळखण्यासाठी कोणा तज्ज्ञाची गरज नाही. मुंबईसारख्या फ्रँचायझीसाठी जिने नेहमीच आपल्या प्रमुख खेळाडूंना प्राधान्य दिले आहे. माहितीचे हे सतत होणारे ‘लीक्स’ ही अत्यंत गंभीर चिंतेची बाब आहे. शब्दांची ही निवड कदाचित कठोर वाटू शकते, पण हेच सत्य आहे. या ड्रेसिंग रूमने गेल्या काही वर्षांत अनेक दिग्गज खेळाडू, कर्णधारपदातील बदल आणि असंख्य घटना पाहिल्या आहेत; तरीही या स्वरूपाची कोणतीही गोष्ट यापूर्वी कधीही घडली नव्हती.”

सूत्रांनी पुढे सांगितले, “व्यवस्थापन या घडामोडींमुळे अत्यंत नाराज आहे. काही खेळाडूंनी सोशल मीडियावर इमोजी पोस्ट केल्यानंतर मोठा गदारोळ माजला होता आणि तेव्हापासून परिस्थिती अजूनही निवळलेली नाही. मग ती ड्रेसिंग रूममधील स्पष्टपणे दिसून येणारी गटबाजी असो, मैदानावर खेळाडूंची बॉडी लँग्वेज असो, किंवा खेळाकडे पाहण्याचा त्यांचा प्रत्यक्ष दृष्टिकोन असो यामागील मूळ समस्या स्पष्टपणे दिसून येत आहेत. जर कोणत्याही खेळाडूला असे वाटत असेल की ते मुंबई इंडियन्सला हलक्यात घेऊ शकतात, तर त्यांनी पुन्हा विचार करण्याची गरज आहे. संघाची प्राधान्ये योग्य दिशेने असल्याचे दिसत नाही. खेळाडू मैदानावर पुनरागमन करण्यासाठी प्रमाणापेक्षा जास्त वेळ घेत आहेत. ज्यामुळे अशी धारणा निर्माण होत आहे की, प्रत्येकजण केवळ आपली हजेरी लावण्यासाठीच येत आहे.”

## रियान परागने वैभवला रागवलं की समजावलं?

**मुंबई (दै. संध्या)**



आयपीएल 2026 ‘क्वालिफायर 2’ सामन्यात, राजस्थान रॉयल्सला गुजरात टायटन्सकडून 7 गडी राखून दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. या ‘नॉकआउट’ सामन्यात, वैभव सूर्यवंशीने राजस्थानसाठी पुन्हा एकदा फलंदाजीचा उत्कृष्ट नमुना पेश केला. एकामागून एक गडी बाद होत असतानाही, वैभवने केवळ डावाला सावरलेच नाही, तर अवघ्या 47 चेंडूंमध्ये 96 धावांची धडाकेबाज खेळीही साकारली. वैभवचे शतक अवघ्या 4 धावांनी हुकले. यापूर्वी, ‘एलिमिनेटर’ सामन्यातही वैभवने 97 धावांची आक्रमक खेळी केली होती. सलग दोन सामन्यांमध्ये वैभवचे शतक हुकल्यामुळे कर्णधार रियान पराग नाराज असल्याचे दिसून आले. ‘क्वालिफायर 2’ मध्ये बाद होऊन वैभव जेव्हा ‘डगआउट’मध्ये परतला, तेव्हा रियान पराग त्याच्याशी काहीतरी बोलण्यासाठी त्याच्याजवळ गेला. सध्या सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असलेल्या एका व्हिडिओमध्ये, रियान पराग वैभवला कानमंत्र देताना किंवा समजावून सांगताना दिसत आहे. असे वाटते की, आपले शतक पूर्ण करण्यासाठी वैभवने पुरेसा सावध पवित्रा घेतला नाही, यावरून रियान पराग त्याला खडसावत आहे. या व्हिडिओमध्ये, रियानचे बोलणे ऐकत असताना वैभवच्या डोळ्यांत स्पष्टपणे अश्रू तरळताना दिसत आहेत.

## फायनलपूर्वी रबाडाचा डंका; पर्पल कॅप हिसकावत भुवीला टाकलं मागे

**मुंबई (दै. संध्या)**



आयपीएल 2026 आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे, तरीही ‘ऑरेंज कॅप’ आणि ‘पर्पल कॅप’ मिळवण्यासाठीची चुरस मात्र अत्यंत रोमांचक बनली आहे. दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात गुजरात टायटन्सने मिळवलेल्या शानदार विजयानंतर या सामन्यात कागिसो रबाडाने गोलंदाजांच्या क्रमवारीत मोठी उलथापालथ करत ‘पर्पल कॅप’वर आपले नाव कोरले. कर्णधार शुभमन गिलने आपल्या शतकी खेळीच्या जोरावर ‘ऑरेंज कॅप’च्या शर्यतीला आणखीच रोमांचक केले आहे. न्यू चंदीगड येथे खेळल्या गेलेल्या आयपीएल 2026 च्या दुसऱ्या क्वालिफायर सामन्यात, गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्सचा 7 गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. 215 धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, कर्णधार शुभमन गिलने 53 चेंडूंत 104 धावांची शानदार खेळी साकारली, तर साई सुदर्शनने 32 चेंडूंत 58 धावांचे योगदान दिले. या जोडीने पहिल्या गड्यासाठी 167 धावांची भागीदारी रचली आणि हा सामना अक्षरशः एकतर्फी करून टाकला. या शतकी खेळीनंतर, आयपीएल 2026 मध्ये शुभमन गिलच्या नावावर आता 15 सामन्यांत एकूण 722 धावा झाल्या आहेत. स्पर्धेतील सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो आता दुसऱ्या क्रमांकावर पोहोचला आहे. मात्र, ‘ऑरेंज कॅप’ अजूनही राजस्थान रॉयल्सच्या 15 वर्षीय फलंदाजीतील सनसनाटी खेळाडू, वैभव सूर्यवंशीकडेच आहे. वैभवने या हंगामात 16 सामन्यांतून एकूण 776 धावा करत आपल्या स्पर्धेतील प्रवासाची सांगता केली. सर्वाधिक धावा करणाऱ्यांच्या यादीत साई सुदर्शन तिसऱ्या क्रमांकावर आहे. दुसऱ्या क्वालिफायरमध्ये 58 धावांची खेळी केल्यानंतर, त्याच्या एकूण धावांची संख्या आता 710 झाली आहे.

दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेचा वेगवान गोलंदाज कागिसो रबाडाने राजस्थानविरुद्ध गोलंदाजीचा उत्कृष्ट नमुना पेश केला. आपल्या 4 षटकांत 34 धावा देत 2 बळी मिळवले. या कामगिरीसह, त्याच्या एकूण बळींची संख्या 28 वर पोहोचली आहे. रबाडा आता आयपीएल 2026 मधील सर्वाधिक बळी घेणारा गोलंदाज ठरला असून, त्याने ‘पर्पल कॅप’वर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारने ‘पर्पल कॅप’च्या शर्यतीत बऱ्याच काळापर्यंत अव्वल स्थान राखले होते. मात्र आता तो दुसऱ्या स्थानावर घसरला आहे. 15 सामन्यांमध्ये त्याच्या नावावर 26 बळी आहेत. दरम्यान, राजस्थान रॉयल्सचा वेगवान गोलंदाज जोफ्रा आर्चर याने दुसऱ्या ‘क्वालिफायर’ सामन्यात एक बळी मिळवला त्याने 16 सामन्यांत 25 बळींसह या हंगामाचा समारोप केला.

आयपीएल 2026चा अंतिम सामना आता 31 मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर गुजरात टायटन्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात खेळला जाईल. हा सामना केवळ विजेतेपदाचा निर्णयच लावणार नाही, तर ‘ऑरेंज कॅप’ आणि ‘पर्पल कॅप’ यांचे भवितव्यही स्पष्ट करेल.

## साई सुदर्शनच्या हिट विकेटवर शुभमन गिलची भन्नाट प्रतिक्रिया!

**मुंबई (दै. संध्या)**



आयपीएल इतिहासात सलग दोन सामन्यांत हिट विकेट होऊन बाद होणारा साई सुदर्शन पहिलाच फलंदाज आहे. व्यावसायिक क्रिकेटमध्येही बॅट हातातून निसटून स्टम्पला लागल्याने दोन सामन्यांमध्ये दोनदा हिट विकेट होऊन बाद होणारा दुसरा कोणताही फलंदाज नसेल. आयपीएल 2026 च्या क्वालिफायर 1 मध्ये (26 मे) रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध आणि क्वालिफायर 2 मध्ये (29 मे) राजस्थान रॉयल्स विरुद्ध सुदर्शन हिट विकेट पद्धतीनेच बाद झाला. याबद्दल त्याने म्हटले की तो काहीतरी नवीन करण्याचा प्रयत्न करेल, त्याचा संघसहकारी शुभमन गिलने मात्र त्याच्या हाताला टेप लावावा लागेल, असे म्हणत मजा घेतली.

आयपीएलच्या इतिहासात सलग दोनदा आणि एकूण तीनदा हिट विकेट बाद झालेल्या सुदर्शनला सामन्यानंतरच्या सादरीकरणात विचारण्यात आले की तो आता अहमदाबादमध्ये आपल्या ग्लोव्हजला गोंद/डिंक लावणार का, यावर तो म्हणाला, “मला वाटतं की मी काही गोष्टी करून बघायला हव्यात. मी आता काही ग्रिप टेक वापरून बघणार आहे आणि काही चेंडू खेळून बघेन आणि त्याचा अनुभव कसा येतो ते तपासेन. गेल्या सामन्यात तर चेंडू जमिनीवर काही वेळा टप्पा पडून मग स्टंप्सना जाऊन आदळला होता. पण या सामन्यात मात्र, मला वाटतं की, चेंडू थेट जाऊन स्टंप्सना भिडावा अशीच माझी इच्छा होती.”

क्वालिफायर २ मध्ये सुदर्शनची बॅट स्टम्पला लागलेली पाहून गिलही खचून गेला होता. तो सामन्यानंतर म्हणाला, ” मला वाटत नाही मी याआधी असे की पाहिलं असेल. सलग दोन वेळा ‘हिट विकेट’ झाल्याचे कुणीच पाहिले नसेल. मी सोशल मीडियावर एक व्हिडिओ पाहिला, ज्यामध्ये हातांना टेप लावलेली होती; मला वाटते की, पुढच्या सामन्यात मलाही तसेच करावे लागेल.”

या आयपीएल हंगामात गिल-सुदर्शन जोडीने चांगली फलंदाजी करताना संघाला वेगवान सुरूवात करून दिली आहे, मात्र मागील दोन सामन्यात सुदर्शन ज्याप्रकारे बाद झाला ते पाहून गिलही नाराज दिसला. क्वालिफायर 2 सामन्यात राजस्थान रॉयल्सने 215 धावसंख्येचे लक्ष्य दिले असताना गिलने शतकी खेळी करत संघाच्या विजयाच्या आशा कायम राखल्या. दोघांनी या सामन्यात 167 धावांची भागीदारी केली. सुदर्शन 32 चेंडूंत 58 धावा आणि गिल 53 चेंडूंत 104 धावा करत बाद झाला. दोघांच्या महत्त्वपूर्ण भागीदारीमुळे जीटीने 18.4 षटकांत 3 विकेट्स गमावत लक्ष्य गाठले आणि तिसऱ्यांदा अंतिम सामन्यात प्रवेश केला. आता अंतिम सामना 31 मे रोजी जीटी विरुद्ध आरसीबी असा होईल.

## फायनलच्या उंबरठ्यावर स्वप्न तुटलं; वैभव सूर्यवंशी भावूक

**मुंबई (दै. संध्या)**

आयपीएल 2026च्या हंगामात, रियान परागच्या नेतृत्वाखालील राजस्थान रॉयल्सचा प्रवास दुसऱ्या क्वालिफायर सामन्यातील पराभवानंतर संपुष्टात आला. या सामन्यात, सर्वांचे लक्ष 15 वर्षीय फलंदाज वैभव सूर्यवंशीवर केंद्रित झाले होते. त्याने आपल्या कामगिरीने कोणाचीही निराशा केली नाही. त्याने 96 धावांची शानदार खेळी साकारली आणि आपल्या संघाला 214 धावांच्या एकूण धावसंख्येपर्यंत पोहोचवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. तथापि, त्याच्या या प्रयत्नांनंतरही, त्याच्या संघाला 7 गडी राखून दारुण पराभवाला सामोरे जावे लागले. या हंगामातील संघाची मोहीम संपल्यानंतर, वैभव सूर्यवंशी अत्यंत व्यथित अवस्थेत दिसून आला; त्याच्या डोळ्यातून अश्रूही येत होते. गुजरात टायटन्सविरुद्ध राजस्थान रॉयल्सचा पराभव झाल्यानंतर, वैभव सूर्यवंशी मैदानावर अत्यंत निराश आणि हताश दिसत होता. हे पाहून रवींद्र जडेजाने त्याच्याशी काही वेळ संवाद साधला. त्यानंतर, वैभवने आपली टोपी वापरून आपला चेहरा लपवण्याचा प्रयत्न केला आणि तो डगआउटमध्ये जाऊन एकाकी बसला. तिथेही त्याच्या चेहऱ्यावरील निराशा स्पष्टपणे दिसून येत होती. जेव्हा त्याच्या डोळ्यांत अश्रू दाटून येऊ लागले, तेव्हा त्याने त्वरित एका टॉवेलने आपला चेहरा झाकून घेतला आणि मान खाली घातली. थोड्याच वेळात, त्याने स्वतःला सावरले आणि तो डगआउटमधून बाहेर आला. सामन्यानंतरच्या बक्षीस वितरण समारंभादरम्यान, वैभव सूर्यवंशी शुभमन गिलशीही थोडक्यात संवाद साधताना दिसून आला.

## गुजरातची फायनलमध्ये दिमाखदार एन्ट्री

**मुंबई (दै. संध्या)**

आयपीएल 2026 च्या ‘क्वालिफायर 2’ सामन्यात, गुजरात टायटन्सने राजस्थान रॉयल्सचा 7 गडी राखून पराभव करत अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. आता विजेतेपदाच्या लढतीत त्यांचा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी होईल. हा सामना रविवार, 31 मे रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर सायंकाळी 7.30 वाजता खेळला जाणार आहे. दोन्ही संघांचे कर्णधार नाणेफेकीसाठी 7 वाजता मैदानावर उपस्थित असतील.

मुल्लानपूर, न्यू चंदीगड येथील महाराजा यादवेंद्र सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात, राजस्थान रॉयल्सचा कर्णधार रियान परागने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी आपल्या 20 षटकांत 6 गडी गमावून एकूण 214 धावा उभारल्या. 215 धावांच्या या विशाल लक्ष्याचा पाठलाग करताना या ‘करो या मरो’ सामन्यात जबरदस्त जिद्द आणि चिकाटीचे प्रदर्शन करत गुजरात टायटन्सने केवळ 18.4 षटकांतच हे आव्हान यशस्वीरित्या पूर्ण केले. या 7 गडी राखून मिळवलेल्या विजयासह, गुजरात टायटन्सने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. पहिल्या डावात, राजस्थान रॉयल्सची सुरुवात अत्यंत खराब झाली.

त्यांनी पहिल्या 9 धावांच्या आतच आपले दोन गडी गमावले होते. त्यानंतर सलामीचा फलंदाज वैभव सूर्यवंशीने डावाला सावरण्याची जबाबदारी स्वीकारली आणि केवळ 47 चेंडूंत 96 धावांची एक शानदार खेळी साकारली. त्याच्या या खेळीत 8 चौकार आणि 7 षटकांचा समावेश होता. त्याने 204.26 चा प्रभावी स्ट्राईक रेट राखला. सूर्यवंशीला साथ देताना, रवींद्र जडेजाने 35 चेंडूंत 5 चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने 45 धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# वैभव टीम इंडियासाठी तयार आहे का?

**मुंबई (दै. संध्या)**



आयपीएल २०२६ मध्ये स्फोटक लक्षवेधी फलंदाजी करणारा वैभव सूर्यवंशी भारतीय संघासाठी किती तयार आहे हा प्रश्न क्रिकेट वर्तुळात मोठ्या प्रमाणात विचारला जात आहे. अनेक दिग्गज आणि तज्ज्ञांनी त्याला शक्य तितक्या लवकर भारतीय संघात सामील करून घेण्याची मागणी केली, तर काहींनी आणखी काही वेळ प्रतीक्षा करण्याची आवश्यकता असल्याचे म्हटले आहे. वैभवला भारतीय संघात स्थान मिळवायचे असेल तर त्याला आपल्या क्षेत्ररक्षणावर काम करावे लागले. राजस्थान रॉयल्सचे क्रिकेट संचालक आणि मुख्य प्रशिक्षक कुमार संगकारा यांनी या वैभवला भारतीय संघात घ्यावे की नाही, या प्रश्नाचे उत्तर दिले आहे.

संगकारा म्हणतात की, एखादा खेळाडू खेळण्यापूर्वी तो तयार आहे की नाही हे कधीच कळत नाही. वैभवने आयपीएल २०२६ मध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या यादीत अव्वल स्थान काबीज केले आहे. त्याने १६ सामन्यांत ४८.५० च्या सरासरीने ७७६ धावा केल्या आहेत. त्याचा संघ अंतिम सामन्यात पोहोचला नसला तरी तो अजूनही ऑरेंज कॅप जिंकू शकतो. त्याने याच आयपीएल हंगामात ख्रिस गेलचा हंगामातील सर्वाधिक षटकारांचा विक्रम मोडला. तसेच त्याने अनेक विक्रमे रचली आहेत.

गुजरात टायटन्स विरुद्धच्या क्वालिफायर २ सामन्यात वैभवने ज्याप्रकारे फलंदाजी करत स्थिती सांभाळली, याने संगकारा प्रभावित झाले. ते सामन्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत म्हणाले, “माझ्या मते त्याने अप्रतिम फलंदाजी केली. एका बाजूला विकेट्स पडत असताना त्याने संयम राखत खेळी केली ती एक खूप कठीण फलंदाजीची कामगिरी होती. त्याने आम्हाला खरोखरच एक चांगली धावसंख्या उभारण्यात महत्त्वाची भुमिका बजावली.”

“हा १५ वर्षांचा मुलगा खूप समजूतदार आहे. तो खेळ चांगला ओळखतो. परिस्थिती चांगल्या प्रकारे समजून घेतो आणि त्याला कसलीही भीती वाटत नाही”, असेही संगकारा म्हणाले आहेत.

वैभव भारतीय संघात खेळण्यास किती तयार आहे, या प्रश्नाचे उत्तरही संगकारा यांनी दिले असून ते म्हणाले, “खेळण्यापूर्वी कोणी तयार आहे की नाही हे कधीच कळत नाही आणि वैभवने जगातील सर्वोत्तम गोलंदाजांविरुद्ध जे काही केले आहे ते पाहता, तुम्ही त्याच्यासमोर उभी कराल अशा कोणत्याही आव्हानाचा सामना करण्यासाठी तो पूर्णपणे सज्ज आहे; आणि मला खात्री आहे की, त्याला कॉल-अप अगदीच लवकर येईल.” आयपीएल २०२६ चा क्वालिफायर २ सामना शुक्रवारी (२९ मे) राजस्थान रॉयल्स विरुद्ध गुजरात टायटन्स असा खेळला गेला. यामध्ये आरआरने वैभवच्या ९६ धावांच्या जोरावर २० षटकांत ६ विकेट्स गमावत २१४ धावसंख्या उभारली होती. लक्ष्याचा पाठलाग करताना जीटीकडून कर्णधार शुभमन गिलने शतकी खेळी केली आणि सामना ७ विकेट्सने जिंकला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### ग्रामदैवतांच्या पालख्या शाही स्नानासाठी वाईकडे मार्गस्थ

वाल्हे (दैनिक संध्या) : दर तीन वर्षानंतर येणाऱ्या अधिकमासाचे औचित्य साधून वाल्हे (ता.पुरंदर) परिसरातील ग्रामदैवतांच्या पालख्या परंपरेनुसार वाई (जि.सातारा) येथील कृष्णा नदीवरील गणपती घाटावर शाही स्नानासाठी शनिवारी (३० मे) सकाळी मार्गस्थ झाल्या आहेत. यावेळी वाल्हे पंचक्रोशीचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ देवासह माता जोगेश्वरी यांच्या पालख्यांचे कुंभारवाडा येथून प्रस्थान होताच ढोल ताशांचा गजर तसेच गुलालाची मुक्त उधळण व “नाथासाहेबांच चांगभल” च्या जयघोषाने संपूर्ण वाल्हे नगरी दुमदुमली होती.त्यातच भवानी माता, कानिफनाथ, मसनेर आदी देवतांसह सुकलवाडी वागदरवाडी कामठवाडी आडाचीवाडी येथील ग्रामदैवतांच्या पालख्या देखील श्री भैरवनाथांच्या पायी पालखी सोहळ्याच्या पाठोपाठ वाईकडे मार्गस्थ झाल्याने परिसरात अक्षरशः भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. या दरम्यान मांडकी, वीर, वाठार कॉलनी, भादे, शिवाजीनगर मार्गे खंडाळा येथे पायी पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम असून रविवारी पहाटे खंडाळा घाटातून परिक्रमा करत पालखी सोहळा सकाळी दहाच्या दरम्यान वाई येथील कृष्णा नदीवर उत्सवमूर्तींच्या शाही स्नानासाठी दाखल होणार आहे. यावेळी श्री भैरवनाथ व माता जोगेश्वरी यांच्या पालखीचे सारथ्य करण्याचा मान भुषण ( आप्पा ) भुजबळ यांना मिळाला असल्याची माहिती भैरवनाथ देवस्थान ट्रस्टचे उपाध्यक्ष दत्तात्रेय पवार यांसह मंदिराचे पुजारी सचिन आगलावे यांनी दिली.

### राष्ट्रीय जनगणनेच्या कामास दांडी; तीन शिक्षकांवर गुन्हा दाखल

यवत (दैनिक संध्या) : आगामी राष्ट्रीय जनगणना 2027 च्या पार्श्वभूमीवर प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या तीन शिक्षकांनी शासकीय कामास जाणीवपूर्वक नकार दिल्याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मंडळ अधिकारी श्रीकृष्ण बाबासाहेब शिरसाट यांनी यवत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रामदास साहेबराव बारवकर (जि.प. प्राथमिक शाळा टुलेवस्ती), सुवर्णा कानिफनाथ खळदकर आणि सिमा सुभाष साबळे (दोघी जि.प. प्राथमिक शाळा गलांडवाडी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम 223 (अ) तसेच जनगणना अधिनियम 1948 चे कलम 11 (1) व 11 (2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी शिक्षकांची राष्ट्रीय जनगणना 2027 साठी गलांडवाडी येथील ब्लॉक क्रमांक 215 मध्ये प्रगणक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना 16 मे 2026 रोजी सकाळी 10 वाजल्यापासून 14 जून 2026 रोजी सायंकाळी 6 वाजेपर्यंतच्या कालावधीत जनगणनेचे काम सोपविण्यात आले होते. मात्र संबंधितांनी या राष्ट्रीय महत्त्वाच्या शासकीय कामास जाणीवपूर्वक नकार देत गैरहजर राहून कर्तव्यात कसूर केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. तसेच संबंधितांना व्हॉट्सअॅप संदेशाद्वारे आदेश व सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र त्यानंतरही त्यांनी आदेशाचे पालन केले नसल्याने त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. या प्रकरणी यवत पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 504/2026 दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस हवालदार मोहिते करीत आहेत.

### लोणावळ्यात 450 फूट खोल दरीत पडून नौदल कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू

लोणावळा (दैनिक संध्या) : लोणावळ्याजवळील आयएनएस शिवाजी येथील एका नौदल कर्मचाऱ्याचा प्रसिद्ध असलेल्या ‘टायगर पॉइंट’ येथील साडेचारशे फूट खोल दरीत पडून दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवारी दुपारी दीडच्या सुमारास घडली. आपल्या मुलांना व्हिडिओ कॉलवर येथील परिसरातील दृश्य दाखवताना तोल गेल्याने दरीत पडून मृत्यू झाल्याच्या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. राकेशकुमार मिश्रा (वय ५०, सध्या रा. आयएनएस शिवाजी, कुरवंडे, लोणावळा ) असे या नौदल कर्मचाऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राकेशकुमार हे ‘आयएनएस शिवाजी’ येथे नौदलात कार्यरत होते. ते गुरुवारी दुपारी टायगर पॉइंट येथे मित्रासोबत फिरण्यासाठी आले होते. या वेळी ते टायगर पॉइंट परिसरात फिरत असताना दरीच्या कडेला उभे राहून त्यांच्या मुलांना मोबाइलवर व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून येथील दृश्य दाखवत होते. या वेळी त्यांचा अचानक तोल गेल्याने ते सुमारे साडेचारशे फूट खोल दरीत पडले.

# तपास होणारच नसेल तर, CID कार्यालयाला टाळे ठोका

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणावरुन रोहित पवार आक्रमक

**पुणे (दै. संध्या)**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील मृत्यू प्रकरणात चार महिन्यांनंतरही राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने (सीआयडी) ठोस माहिती आणि तपासातील प्रगती अहवाल सादर केलेला नाही; त्यामुळे ‘तपास होणारच नसेल, तर ‘सीआयडी’च्या कार्यालयाला टाळे ठोका,’ अशी खरमरीत टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी शुक्रवारी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी रोजी बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला होता. या प्रकरणाचा सखोल तपास करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी रोहित पवार यांनी केली होती. या अनुषंगाने ठोस कारवाई न झाल्याने रोहित पवार यांनी कुलूप घेऊन ‘सीआयडी’ कार्यालयाला भेट दिली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी ‘सीआयडी’वर टीकेची झोड उठवली. ‘विमान अपघात प्रकरण अत्यंत संवेदनशील असूनही ‘सीआयडी’कडून अतिशय संथ गतीने तपास सुरू आहे.

‘राज्यातील महत्त्वाच्या नेत्याचा विमान अपघातात मृत्यू झाला असून, त्यामागचे सत्य अद्याप बाहेर आलेले नाही. या प्रकरणाचा तपास नेमका कोणत्या दिशेने सुरू असून, त्यामध्ये किती प्रगती झाली, याची माहिती जनतेला मिळायला हवी. मात्र, तपास यंत्रणा अकार्यक्षम असून, सरकारचे लक्ष वेधण्यासाठी कुलूप घेऊन आंदोलन केले,’ असे पवार म्हणाले.

‘सीआयडी’मार्फत केल्या जाणाऱ्या तपासाबद्दल यापूर्वी शंका उपस्थित केली जात नव्हती; परंतु आता परिस्थिती बदलली आहे. अजित पवार यांच्या अपघाती मृत्यू प्रकरणाच्या तपासाची माहिती घेण्यासाठी चार महिन्यांपासून प्रयत्न सुरू आहेत; त्यामुळे अजित पवार विमान अपघाती मृत्यू प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपविण्यात यावा,’ अशी मागणी रोहित पवार यांनी केली.




**तपास योग्य दिशेने सुरू**

अजित पवार विमान अपघात मृत्यू प्रकरणाचा तपास योग्य दिशेने सुरू आहे. ‘सीआयडी’कडून विविध विभाग; तसेच संस्थांशी संपर्क साधण्यात आला आहे. विविध यंत्रणांकडून तपासाच्या अनुषंगाने लागणारी माहिती आणि अहवाल मिळवण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे,’ अशी माहिती ‘सीआयडी’च्या अधिकाऱ्यांनी दिली.

## प्रवाशांची संख्या तीन लाखांवर पोहोचणार, मेट्रोची क्षमता दुप्पट होणार; सहा डब्यांची मेट्रो लवकरच खरेदी करणार

**पुणे (दै. संध्या)**

मेट्रो लाइन 1 आणि 2वरील प्रवासी संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. येत्या काही महिन्यांमध्ये तिसरी मेट्रो मार्गिका सुरू झाली की ही संख्या 50 टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. सर्व प्रवाशांना सहजपणे सामावून घेण्यासाठी महा मेट्रोने ट्रेनच्या डब्यांची संख्या वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. पुढील काही महिन्यांमध्ये पुण्यात मेट्रोने प्रवास करणं आणखी सुखकर होणार आहे.

हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाइन 3वरून मेट्रो 1 आणि 2ने प्रवास करता येता येणार आहे. दोन्ही मेट्रोसाठी इंटरचेंज तयार केले असून पुण्यात प्रवास तिन्ही मेट्रोने प्रवास करू शकतात. हिंजवडी आयटी पार्कमध्ये दररोज लाखो कर्मचारी शहरातून आणि शहराबाहेरून कामानिमित्त जातात. मेट्रो 3 सुरू होताच हे सर्व कर्मचारी मेट्रोचा वापर करतील. त्यामुळे पहिल्या दोन मेट्रोवरील भार ही वाढणार आहे. त्यामुळे मार्गिका 1 आणि 2वर आता तीनऐवजी सहा डब्यांची मेट्रो धावणार आहे.

मार्च 2022 ते सप्टेंबर 2024पर्यंत टप्प्या-टप्प्याने मेट्रो लाइन 1 आणि मेट्रो लाइन 2 सुरू करण्यात आली. मेट्रो 1 पिंपरी-चिंचवड महानगरपालिका ते स्वारगेट जोडते, आणि मेट्रो 2 वनाझ ते रामवाडी जोडते. संपूर्ण पुणे शहरातून या मेट्रो जात असून एकूण 33.28 किमी लांब मार्ग आहेत. यापैकी बहुतेक मार्ग उन्नत असून उर्वरित 5 किलोमीटर भाग भूमिगत आहे. हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रोमुळे यामध्ये 23 किलोमीटरची भर पडणार आहे. जुलै महिन्यात मेट्रोचा पहिला टप्पा सुरू होणार आहे. प्रवाशांसाठी 12 स्थानकं खुली करण्यात येतील, राजीव गांधी इन्फोटेक पार्कला थेट शहराच्या मध्यवर्ती भागाशी जोडण्यात येणार आहे. तसेच, उपलब्ध इंटरचेंजमुळे पिंपरीच-चिंचवड, स्वारगेट आणि रामवाडीसह अनेत ठिकाणी जोडणार आहे.

"मार्च 2026मध्ये मेट्रो लाइन 1 आणि 2ची एकूण प्रवासी संख्या 1,87,299वर पोहोचली. गेल्या चार वर्षांपासून दोन्ही मार्गांवर तीन डब्यांच्या मेट्रोचा वापर केला जात आहे. सध्याच्या प्रवासी संख्येसाठी हे डबे पुरेसे आहेत.

## शेतकऱ्यांसाठी कामाची बातमी! कार्यालयात खेटा मारणं बंद, अवघ्या 14 दिवसांत जमिनीची मोजणी

**पुणे (दै. संध्या)**



भूमी अभिलेख विभागाने पोटहिस्सा मोजणीचा क्रांतिकारी निर्णय घेतल्यानंतर आता कमी दिवसांत मोजणी करण्याची मोहीम हाती घेतली आहे. प्रलंबित मोजण्यांची संख्या कमी करण्यासाठी; तसेच तातडीने जमीन मालकांना त्यांच्या जमिनीच्या मोजणीचा कालावधी कमी करून देण्यासाठी ‘द्रुतगती’ मोजणी आता केवळ १४; तर नियमित मोजणी २८ दिवसांत करून देण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे. राज्यातील १०५ तालुक्यांमध्ये या मोहिमेची एक जूनपासून अंमलबजावणी होणार आहे.

राज्यात गेल्या अनेक वर्षांपासून मोजण्यांची प्रकरणे प्रलंबित राहत आहेत. त्याच्या तक्रारींची दखल घेऊन तत्कालीन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी युद्धपातळीवर विविध प्रयत्न सुरू केले होते. मोजणी प्रकरणे निकाली काढण्यासाठी १२०० रोव्हर ही अत्याधुनिक मशिन खरेदी करण्यात आली. त्यापाठोपाठ भूकरमापकांची संख्या अपुरी असल्याने खासगी एजन्सीमार्फत भूकरमापकांची नियुक्ती करण्यात येत आहे.

आजमितीला राज्यात ३४०० इतके भूकरमापक आहेत. गेल्या काही वर्षांपासून राज्यात लाखभर मोजण्या प्रलंबित होत्या. त्यांची संख्या कमी झाली आहे. मोजण्यांचा पूर्वीचा कालावधी हा ९० दिवसांवर आला असून, हा कालावधी एका महिन्यावर आणण्याचे भूमी अभिलेख विभागाचे प्रयत्न आहेत.

## आदित्य बिर्ला ज्वेलरीचा ब्रँड इंद्रियाने सादर केले 'एक रागा'; सामायिक सांस्कृतिक लयीला अद्वितीय मानवंदना

**पुणे (दै. संध्या)**

भारताचा नृत्य, कारागिरी, वास्तुकला आणि प्रांतीय परंपरांचा समृद्ध वारसा लक्षात घेऊन आदित्य बिर्ला ज्वेलरीचा ब्रँड इंद्रियाने अद्वितीय सांस्कृतिक सादरीकरण एक रागा चे अनावरण केले आहे. हे सादरीकरण नृत्य या तत्त्वावर आधारित आहे, जिथे प्रत्येक हावभाव व हालचाल कथानक बनते आणि शरीर अभिव्यक्तीचे माध्यम बनते.

पुण्यात 'एक राग' सादरीकरण महाराष्ट्राच्या उत्सवप्रिय भावनेतून आणि लय, आत्मविश्वास व सादरीकरणात खोलवर रुजलेल्या 'लावणी' या नृत्यप्रकाराच्या हावभावयुक्त ऊर्जेतून प्रेरणा घेते. फिनिक्स मार्केट सिटी, पुणे येथे असलेले हे सादरीकरण प्रकाश, समृद्धी आणि शुभ सुरुवातीचे पारंपारिक प्रतीक असलेल्या 'दीपस्तंभ' या संकल्पनेवर आधारित आहे. ही जागा पारंपारिक महाराष्ट्रीयन सौंदर्यशास्त्राने प्रेरित घटकांना एकत्र आणते, जिथे हालचाल, संगीत आणि अलंकार हे एकात्मिक कथनाचा भाग बनतात. लावणीप्रमाणेच, जिथे प्रत्येक हालचालीत आत्मविश्वास आणि भावना असतात, ही जागा वधूचे व्यक्तिमत्त्व आणि तिची ओळख घडवणाऱ्या काळाच्या पलीकडील सांस्कृतिक विधींना दाखवते.

या सादरीकरणाच्या केंद्रस्थानी, इंद्रियाचे दागिने नथ, पाटल्या आणि कोल्हापुरी साज यांसारख्या वैशिष्ट्यपूर्ण दागिन्यांच्या माध्यमातून या प्रदेशाची सांस्कृतिक ओळख सादर करतात; जे महाराष्ट्रीयन वधूच्या वारशाशी आणि




मांगलिक अभिव्यक्तीशी खोलवर जोडलेल्या अलंकार परंपरांना प्रकाशझोतात आणतात.

एकाच एकात्मिक लयीच्या माध्यमातून भारताच्या विविध सांस्कृतिक ओळखींचा उत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने ही मोहिम पुणे, हैदराबाद, भुवनेश्वर आणि दिल्ली येथे राबवली जात आहे.

प्रत्येक शहर तेथील नृत्यप्रकार, कलात्मक प्रभाव, दागिन्यांच्या परंपरा आणि वधूच्या अभिव्यक्तींद्वारे एक वेगळी प्रादेशिक कथा सादर करते, जी विविध प्रांतांमधील वधूची स्वप्ने सादर करते, तसेच लावण्य, सौंदर्य, आस आणि उत्सव या सामायिक भावनांद्वारे एकमेकांशी जोडलेली राहून स्वतःच्या स्वप्नातील वधू बनण्याची महत्त्वाकांक्षा जागृत करते.

या मोहिमेबाबत मत व्यक्त करत इंद्रियाचे मार्केटिंग अँड व्हिज्युअल मर्चंडाइजिंगचे प्रमुख शांतिस्वरूप पांडा म्हणाले, ‘एक रागा’च्या माध्यमातून आम्हाला अशा एका अनुभवाची निर्मिती करायची होती, जिथे संस्कृती फक्त पाहिली जाणार नाही, तर मनापासून अनुभवली जाईल. प्रत्येक प्रांतीय सादरीकरणाची स्वतःची एक दृश्यात्मक भाषा आहे, आणि तरीही एका सामायिक भावनिक लयीद्वारे एकमेकांशी जोडलेली आहे, ज्यामधून भारतातील विविध सांस्कृतिक अभिव्यक्ती दिसून येतात. 'एक रागा"च्या माध्यमातून, दागिने हे फक्त अलंकार न राहता ओळख, कलात्मकता आणि वारशाचे उत्साही माध्यम बनतात, जे विविध वधूंच्या स्वप्नांना एकात्मिक भावनिक अनुभवात एकत्र आणतात.”

'एक रागा' देशभरात वाटचाल करत असताना ही मोहिम विलोभनीय कथाकथन आणि समकालीन सांस्कृतिक अनुभवांच्या माध्यमातून भारतातील प्रांतीय कलात्मकतेचा उत्सव साजरा करण्याच्या इंद्रियाच्या कटिबद्धतेला अधिक दृढ करत आहे.

वारसा, सादरीकरण, कारागिरी आणि डिझाइन यांना एकत्र आणून हा उपक्रम दागिन्यांची निर्मिती करण्याच्या ब्रँडच्या दृष्टिकोनाला दृढ करतो, जिथे हे दागिने फक्त परिधान केले जात नाहीत, तर अनुभवले जातात.

# एव्हरेस्ट सर करणारी जिद्दीची शिखरयात्री बचेंद्री पाल

## बचेंद्री पाल म्हणजे धाडस, नेतृत्व आणि समाजसेवेचा प्रेरणादायी प्रवास: डॉ. आशा बोकील

**पुणे (दै. संध्या)**



भारतातील महिलांच्या कर्तृत्वाचा इतिहास लिहिताना बचेंद्री पाल यांचे नाव अत्यंत अभिमानाने घेतले जाते. २३ मे १९८४ रोजी जगातील सर्वोच्च एव्हरेस्ट शिखर सर करून त्यांनी भारतीय महिलांच्या सामर्थ्याला नवे आकाश दिले. या ऐतिहासिक कामगिरीला यंदा ४२ वर्षे पूर्ण झाली, तर नुकताच त्यांचा ७२ वा वाढदिवस साजरा झाला. या निमित्ताने पाल यांच्यावरील पुस्तकाच्या लेखिका डॉ. आशा बोकील यांनी त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचा घेतलेला हा वेध...

उत्तराखंडमधील नाकुरी या छोट्याशा गावात जन्मलेल्या बचेंद्री पाल यांनी अत्यंत साध्या परिस्थितीतून संघर्ष करत स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले. लहानपणापासूनच डोंगर-दऱ्यांबद्दल आकर्षण असलेल्या बचेंद्री यांनी शिक्षणासोबत गिर्यारोहणाची आवड जोपासली. पुरुषप्रधान क्षेत्र समजल्या जाणाऱ्या गिर्यारोहणामध्ये त्यांनी दाखवलेले धाडस हे त्या काळात अभूतपूर्व होते. वयाच्या अवघ्या २९ व्या वर्षी त्यांनी एव्हरेस्ट शिखर सर करून इतिहास घडविला. त्या एव्हरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या. त्यांच्या या अभूतपूर्व कामगिरीबद्दल भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविले.

मात्र, एव्हरेस्ट सर करणे ही त्यांच्या प्रवासाची केवळ सुरुवात होती. त्यानंतर त्यांनी टाटा स्टील अॅडव्हेंचर फाउंडेशनच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना साहसी जीवनाचे प्रशिक्षण दिले. गिर्यारोहण, रिव्हर राफ्टिंग, ट्रान्स हिमालयीन मोहिमा, महिला एव्हरेस्ट मोहीम अशा अनेक साहसी उपक्रमांचे त्यांनी नेतृत्व केले. महिलांमध्ये आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत मोठा गुण म्हणजे सामाजिक बांधिलकी. उत्तराखंड व गुजरातमधील आपत्तीग्रस्तांना मदत असो किंवा गरजू मुलांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न. बचेंद्री पाल नेहमी समाजाच्या पाठीशी उभ्या राहिल्या. प्रसिद्धीपासून दूर राहून साधी राहणी आणि उच्च विचारसरणी जपणाऱ्या बचेंद्री पाल यांचे व्यक्तिमत्त्व आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. २०१९ मध्ये त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पण पुरस्कारांपेक्षाही त्यांच्या कार्यातून निर्माण झालेली प्रेरणा अधिक मोठी आहे. त्यांनी अनेक तरुण गिर्यारोहक घडविले, महिलांना स्वतःच्या क्षमतेची जाणीव करून दिली आणि “अशक्य” हा शब्द जिद्दीपुढे किती छोटा असतो हे दाखवून दिले.

आज ७२ व्या वर्षीदेखील त्यांची ऊर्जा, कार्यतत्परता आणि समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ कायम आहे. म्हणूनच बचेंद्री पाल या केवळ एव्हरेस्टवीर नाहीत, तर त्या जिद्द, धाडस आणि माणुसकीचे जिवंत प्रतीक आहेत.

